सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २८७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# मुंबईसह १५ महापालिकेत असणार महिलाराज!

## २९ महापौरपदाच्या आरक्षण सोडत जाहीर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ डिसेंबर -**

राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदासाठीचे आरक्षण सोडत गुरुवारी काढण्यात आली. बृहन्मुंबईसह राज्यातील पंधरा महापालिकामध्ये महिलाराज असणार आहे. मुंबईमध्ये सर्व साधारण महिला तर सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, पिंपरी-चिंचवड व भिवंडी-निजामपूर या ठिकाणचे महापौरपद अडीच वर्षासाठी सर्वसाधारण गटासाठी असणार आहे.

२९ महापालिकासाठी १५ जानेवारीला मतदान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर झाला. मात्र महपौरपदाचे आरक्षण सोडत न झाल्याने त्याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर नगरविकास विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात अडीच वर्षासाठी महापौरपदासाठी आरक्षणाची सोडत काढण्यात आली.यावेळी विविध राजकीय पक्षाचे नेते उपस्थित होते.

**✻ २९ ठिकाणचे आरक्षण असे -**

✻अनुसूचित जमातीसाठी राखीव महापालिका कल्याण-डोंबिवली

अनुसचित जातीसाठी राखीव महापालिका - ठाणे (सर्वसाधारण), जालना (महिला), लातूर (महिला).

✻ नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला आरक्षण) - जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर, अकोला

✻ नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर, उल्हासनगर.

✻ सर्वसाधारण महिला आरक्षण पुणे, धुळे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा- भाईंदर, नागपूर, नाशिक.

सर्वसाधारण प्रवर्ग -

छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, भिवंडी-निजामपूर.

असे प्रवर्ग

अनुसूचित जमाती - १,

अनुसूचित जाती - ३

नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) - ८,

सर्वसाधारण - १७२९ महानगरपालिकांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकच पद आरक्षित होत आहे. नियमातील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी पद देय होत नाही. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३ पदे आरक्षित झाली असून, त्यापैकी २ पदे अनुसूचित जाती (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी ८ पदे आरक्षित झालेली असून, त्यापैकी ४ पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत. उर्वरित १७ महानगरपालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी ९ पदे येत असून, ८ पदे खुला (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आहेत.

### मुंबईच्या आरक्षण सोडतीमध्ये फिक्सिंग : ठाकरे गटाचा आरोप

मुंबई महानगरपालिका महापौर पदाच्या आरक्षणात अनुसुचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण डावलल्याचा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाने केला आहे. आरक्षण सोडतीच्यावेळी गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी त्याबाबत आक्षेप नोंदविला आहे.मुंबई महानगरपालिकेत मागील २५ वर्षापासून ओबीसी आणि अनुसुचित जमाती प्रवर्गाला आरक्षण मिळालेले नाही. इतर महानगरपालिकेसाठी जी पद्धत अवलंबली त्यात मुंबईला का बाहेर काढण्यात आले. कारण भाजपा व शिंदे गटाकडे या प्रवर्गातील नगरसेवक नसल्याने मुंबईला त्या सोडतीतून वगळण्यात आले, असे त्यांनी सांगितले.नागपूरमध्येही महापौर पदाचे आरक्षण ठरवून करण्यात आले असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे जेष्ठ नेते विजय वड्डेटीवार यांनीही केला आहे.

### आरक्षण सोडत नियमानुसार: मंत्री माधुरी मिसाळ

राज्यातील २९ महापालिक हिच्या महापौर पदाची आरक्षणाची सोडत नियमानुसार करण्यात आली आहे. ठाकरे गटाचा आक्षेपाची नोंद घेण्यात आली आहे. त्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

**: माधुरी मिसाळ**
**(नगरविकास राज्यमंत्री)**

# छत्रपती संभाजीनगरच्या बॅ. अर्चना अरुण मेढेकर यांची कॅनडात न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती

## मराठी कर्तृत्वाचा जागतिक पातळीवर ठसा



**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ जानेवारी-**

जगाच्या विविध क्षेत्रांमध्ये मराठी माणसाने आपल्या बुद्धिमत्ता, मेहनत आणि व्यावसायिक उत्कृष्टतेच्या जोरावर ठोस स्थान निर्माण केले आहे. या यशपरंपरेत छत्रपती संभाजीनगरच्या बॅ. अर्चना अरुण मेढेकर यांच्या नावाची मानाची भर पडली असून, त्यांची कॅनडातील ओंटारियो प्रांतात (फोर्ट फ्रान्सिस/केनोरा जिल्हा) न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

माणिकचंद पहाडे लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथील माजी विद्यार्थिनी असलेल्या बॅ. मेढेकर यांनी कायद्याच्या क्षेत्रात सातत्यपूर्ण कामगिरी, व्यावसायिक प्रामाणिकपणा आणि उच्च नैतिक मूल्यांच्या आधारे आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वासार्हता प्राप्त केली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे भारतीय, विशेषतः मराठी समाजाच्या बौद्धिक क्षमतेचा आणि कायदेशीर कौशल्याचा जागतिक पातळीवर ठळक प्रत्यय आला आहे. कॅनडासारख्या विकसित देशातील न्यायव्यवस्थेत न्यायमूर्तीपदावर मराठी महिलेला मिळालेली ही जबाबदारी ऐतिहासिक मानली जात असून, यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात अभिमानाची भावना व्यक्त केली जात आहे.

ही नियुक्ती केवळ वैयक्तिक यश नसून, भारतातील कायदेविषयक शिक्षण संस्थांच्या गुणवत्तेची आणि महिलांच्या सक्षमीकरणाची सशक्त साक्ष असल्याचे मानले जात आहे.

## कलाकारांचे हिवाळी फिटनेस मंत्र

**छत्रपती संभाजीनगर -** हिवाळ्यात फिटनेस टिकवणे आव्हानात्मक असले तरी एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकारांनी साध्या, शिस्तबद्ध आणि परिणामकारक फिटनेस सवयींमुळे हे उद्दिष्ट साध्य केले आहे. 'घरवाली पेडवाली'मधील पारस अरोरा नियमित स्ट्रेचिंग व बेसिक वर्कआउटवर फोकस करतात. 'हप्पू की उलटन पलटन'मधील सोनल पनवार घरगुती कार्डिओ, योगा व डान्ससह हेल्दी रुटीन फॉलो करतात. तर 'भाबीजी घर पर है २.०'मधील आसिफ शेख योगा, प्राणायाम, चालणे आणि संतुलित आहारावर भर देतात. सातत्य, साधेपणा आणि हेल्दी लाईफस्टाईलमुळे हे कलाकार हिवाळ्यातही फिट आणि एनर्जेटिक राहतात.




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 31 जानेवारी 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सर 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad** • **Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्वीकृत सदस्य पदासाठी होतेय मोठी रस्सीखेच. !

तभा वृत्तसेवा

लातूर , दि. २२ जानेवारी : लातूर शहर महानगरपालिकेत निवडल्या जाणाऱ्या एकूण सात स्वीकृत नगरसेवक पदासाठी काँग्रेस आणि भाजपच्या इच्छुकांकडून मोठी रस्सीखेच होत असल्याचे दिसत आहे.

लातूर मनपात एकूण ७० नगरसेवक आहेत. त्याप्रमाणात येथे सात जणांना स्वीकृत सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. लातुरात काँग्रेसचे पाच तर भाजपचे दोन स्वीकृत नगरसेवक निवडले जाणार आहेत. दोन्ही प्रमुख पक्षांकडून या पदासाठी आपल्यालाच समाधी मिळावी अशी मागणी दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून केली जाताना पाहायला मिळत आहे. त्याकरिता अनेकांनी आपआपल्या पध्दतीने लॉबिंगही करणे सुरु केले आहे. यावेळच्या मनपा निवडणुकीत भाजप - काँग्रेसकडून अनेक इच्छुकांना संख्येअभावी उमेदवारी देणे शक्य झाले नव्हते. त्यामुळे ऐन निवडणुकीत नाराज कार्यकर्त्यांचे बंड शमवण्याची पाळी पक्षनेत्यांवर आली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. वर्षानुवर्षे पक्षासाठी खस्ता खाणाऱ्या कार्यकर्त्यांनी पक्षाकडून एखाद्या पदाची अभिलाषा बाळगणे गैर नाही. परंतु पक्षही कार्यकर्त्याच्या कार्याचा आवाका पाहून त्याबाबत निर्णय घेत असतो.लातूर मनपात स्वीकृत सदस्य म्हणून आपल्याला संधी देण्यात यावी,अशी मागणी अनेकांनी आपआपल्या पक्षाच्या नेत्यांकडे केल्याचे दिसत आहे. आता प्रत्यक्षात कोणाला संधी मिळते हे काळच सांगणार आहे.



# लातूरचे महापौरपद प्रथमच एससी महिला प्रवर्गासाठी आरक्षित

## आ. अमित देशमुख महापौर पदाची संधी कोणाला देणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा**

लातूर, दि. २२ जानेवारी : लातूर शहर महानगरपालिकेचे महापौर पद प्रथमच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी आरक्षित झाले आहे. लातूर मनपात काँग्रेस - वंचित आघाडीला बहुमत मिळाल्याने आ. अमित देशमुख महापौर पदासाठी कोणत्या नावाला प्राधान्य देतात याकडे लातूरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदांचे आरक्षण गुरुवारी मुंबईत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आले. आजच्या महापौर पदाच्या आरक्षणाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून होते. आरक्षणाबद्दल अनेक तर्क लावले जात होते. त्या सर्व तर्कांना आता पूर्णविराम मिळाला आहे. लातूर शहर मनपाचे महापौर दर्प अनुसूचित जाती प्रवर्गाच्या महिलेसाठी राखीव झाले आहे. लातूर शहरातील प्रभाग क्रमांक १०, १२ व १३ मधून निवडून आलेल्या नगरसेविकांपैकी कोणाला महापौर पदाची संधी मिळते ? याची उत्सुकता लातूरकरांना लागली आहे.

विशेष म्हणजे लातूर महानगरपालिकेत काँग्रेसचे स्पष्ट बहुमत असून काँग्रेस सोबत आघाडी करून पाच जागा लढवून त्यापैकी चार जागा जिंकलेल्या वंचित बहुजन आघाडीकडेही या प्रवर्गाच्या दोन महिला सदस्य असल्याने महापौर पदाची उत्सुकता वाढली आहे. वंचित बहुजन




आघाडीकडून विजयी झालेल्या नगरसेविकेला महापौर पदावर काम करण्याची संधी मिळण्याची शक्यता खूप कमी असल्याचेही बोलले जात आहे. लातूर मनपावर आ. अमित देशमुख यांचे निर्विवाद वर्चस्व असल्याने ते ज्या उमेदवाराचे नाव निश्र्चित करतील तो उमेदवार महापौर असणार आहे. शहरातील प्रभाग क्रमांक दहा मधून निवडून आलेल्या सौ. कांचन दीपरत्न अजनीकर यांची नगरसेवकपदाची दुसरी टर्म असून त्यांचा शैक्षणिक आलेख पाहता महापौरपदासाठी त्यांच्या नावावर एकमत होण्याची शक्यताही काँग्रेसच्या वर्तुळातून वर्तवली जात आहे.

लातूर शहर मनपाची ही तिसरी सार्वत्रिक निवडणूक होती. या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ७० पैकी ६५ जागा लढवून तब्बल ४३ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. तसेच काँग्रेसने वंचितसोबत आघाडी करून त्यांना पाच जागा सोडल्या होत्या. त्यापैकी चार जागेवर वंचितचे उमेदवार विजयी झाल्याने काँग्रेस - वंचितच एकूण ४७ नगरसेवक मनपात कार्यरत झाले आहेत. वंचितच्या सहकार्यामुळे लातुरात काँग्रेसला अनेक जागांचा फायदा झाल्याने आ. अमित देशमुख मनपाच्या सत्तेत वंचित समाधानकारक वाटा देतील असे दिसून येत आहे. काँग्रेसच्या या नेत्रदीपक विजयात वंचितांचा निश्र्चितच मोलाचा वाटा राहिला आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या प्रथम महापौर म्हणून काँग्रेसच्या स्मिता खानापुरे यांनी काम पाहिले आहे. त्यांचा अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर अख्तर मिस्त्री - शेख याना महापौर पदाची संधी देण्यात अली. मात्र ते आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नसल्याने एक वर्षासाठी ड. दीपक सूळ यांना एक वर्षासाठी महापौर पदाची संधी देण्यात आली. २०१७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत लातुरात भाजपने बहुमत संपादन केले. काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या सुरेश पवारांना अडीच वर्षे महापौर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पुढील अडीच वर्षाच्या महापौर पदाच्या निवडीत लातुरात नाट्यमय घडामोडी घडून काँग्रेसचे विक्रांत गोजमगुंडे महापौर तर भाजपाचे चंद्रकांत बिराजदार उपमहापौर झाले होते. मनपा पदाधिकाऱ्यांची २०२२ मध्ये संपल्यानंतर तेव्हापासून आतापर्यंत मनपावर प्रशासक राज होते. मनपाचा कारभार आता नूतन पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला जाणार आहे.

# जि.प.,पं.स. निवडणुकीसाठी १ हजार ५५० अर्ज

**तभा वृत्तसेवा**

लातूर दि. २२ : जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याकरिता अनेक इच्छुकांनी शेवटच्या दिवसाचा मूहुर्त साधला . लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी आणि पंचायत समितीच्या ११८ गणासाठी एकूण १ हजार ५५० अर्ज दाखल झाले आहेत.

सर्वाधिक अर्ज हे उदगीर तालुक्यातून दाखल झाले आहेत. इच्छुकांची संख्या अधिक असल्याने हा आकडा वाढला असला तरी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी काय चित्र राहणार हे पहावे लागणार आहे. नगरपालिका आणि महापालिकेनंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तब्बल ९ वर्षानंतर या होत असल्याने इच्छुकांची संख्याही मोठी आहे. ज्या पक्षासाठी आपण वर्षानुवर्षे काम करतोय त्या पक्षाकडून पक्षाकडून उमेदवारी मिळणार या आशेवर अनेकांनी अर्जाची खरेदी तर केली होती पण भरण्यासाठी 'वेट अण्ड वॉच'च्या भूमिकेत अनेकजण होते. बुधवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सकाळपासूनच निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाबाहेर इच्छुकांनी गर्दी केली होती. त्यामुळे दुपारी ३ नंतरही इच्छुकांची गर्दी ही कार्यालय परिसरात होती. जिल्ह्यातील पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी ९५२ तर जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी ५९८ अर्ज दाखल झाले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषदेचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. जिल्हा परिषदेला जिल्ह्याचे मिनी मंत्रालय म्हणूनही ओळखले जाते. जिल्ह्याच्या विकासात जिल्हा परिषदांचे योगदान महत्वपूर्ण असते. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थेवर ताबा मिळवण्यासाठी काँग्रेस - भाजपचे नेते प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात. ही निवडणूकही अपेक्षेप्रमाणे चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## थोडक्यात...

### तीन महिन्याची रक्कम एकत्रित येणार?

लातूर : महानगरपालिका निवडणुकीवर परिणाम पहाता निवडणूक आयोगाने डिसेंबर महिन्याचा हप्ता देण्यास मंजुरी दिली. डिसेंबरचा हप्ता मिळाला पण जानेवारी महिन्याचा हप्ता देण्यास नकार देण्यात आला. पण अद्यापही अनेक लाडक्या बहिणींचा नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हप्ता रखडला आहे. त्यासाठी लाडक्या बहिणी रस्त्यावर उतरल्या आहेत. लवकरच जानेवारी महिन्याच्या हप्त्यासोबतच नोव्हेंबर आणि डिसेंबरची थकित रक्कम (एकूण ४५०० रुपये) जमा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, या संदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये अस्वस्थता कायम आहे.

### श्र्वसनविकार तज्ज्ञांच्या विभागीय परिषदेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर : मराठवाड्यातील श्र्वसनविकार तज्ज्ञ व फिजिशियन यांची विभागीय परिषद दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूरच्या अंबाजोगाई रोडवरील हॉटेल कार्निवल येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती परिषदेचे संयोजक डॉ. रमेश भराटे यांनी दिली.

वाढते प्रदूषण, औद्योगीकरण, वाढते तापमान व हवामानातील वारंवार होणारे बदल यामुळे मानवी आरोग्यावर अनेक परिणाम होत आहेत. विशेषतः श्र्वसनविकार दमा, हृदय रोग, फुफ्फुसाचे कॅन्सर इत्यादी गंभीर आजारांचे प्रमाण वाढत असून या आजारांचे वेळीच निदान व उपचार होणे आवश्यक असते. या आजारांचे निदान करण्यासाठी अद्यावत तंत्रज्ञान उपयुक्त ठरत आहे. तसेच श्र्वसनविकार तज्ज्ञ यांनी हे अद्यावत ज्ञान आत्मसात करून त्याचा वापर रुग्णांना करावा, यासाठी ही परिषद महाराष्ट्र चेस्ट सोसायटी, एपीआय लातूर, एसोसिएशन ऑफ मेडिकल स्पेशालिटी आयएमए महाराष्ट्र व यशोदा हॉस्पिटल हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला देशातील नामवंत डॉक्टर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

श्र्वसन विकार तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. संतोष कुलकर्णी, डॉ. नागार्जुन मात्र, डॉ. हमीद चौधरी, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. प्रेमकिशोर तोष्णीवाल, डॉ. गोपीकिशन भराडिया, डॉ. अशोक गानू, डॉ. राजेश पाटील, डॉ. चंद्रकांत

### पुजा रोकडेचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

रेणापूर, दि. २२ जानेवारी : येथील शिवाजी महाविद्यालयाच्या पुजा रोकडे या विद्यार्थिनींने वाद-विवाद स्पर्धेत वैयक्तिक प्रथम पारितोषिक पटकाविल्या बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश यादव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जनविकास वरिष्ठ महाविद्यालय बनसारोळा ( ता.केज ) येथे नुकतीच वाद विवाद स्पर्धा संपन्न झाली . या स्पर्धेत येथील शिवाजी महाविद्यालयाची कु. पुजा रोकडे या विद्यार्थीनीने वैयक्तिक प्रथम पारितोषिक मिळवले आहे. तीन हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. प्राचार्य डॉ. यादव यांनी कु. पुजा रोकडे हिचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा दिल्या . यावेळी

अभ्यासबरोबर तिने विविध स्पर्धेत भाग घेऊन स्वतः बरोबरच महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

या कार्यक्रमाला वादविवाद मंडळाचे प्रमुख डॉ.जयद्रथ जाधव, उपप्राचार्य डॉ.पी.आर.शिंदे, डॉ. गणेश नागरगोजे, वादविवाद मंडळातील डॉ. नांदे एस.एम., डॉ.क्रांती मोरे आणि डॉ. शाम लेंडवे, डॉ.आर.सी.जाधव, डॉ. अर्जुन कसबे, डॉ.रामदास खोकले,डॉ. शंकर यादव, डॉ. भुजबळ मनोज, डॉ.उमाकांत कांबळे, डॉ.ज्ञानदेव राऊत,डॉ. अनिल ठेंगे, डॉ. प्रकाश कुलाळ यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रंथभेट योजनेसाठी प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ : जानेवारी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी 'ग्रंथभेट' योजनेतंर्गत सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येणार येतात.

या योजनेतंर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या ' शासनमान्य ग्रंथ निवड यादी' मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ कॅलेंडर वर्षात दि. १ जानेवारी, २०२५ ते दि. ३१ डिसेंबर, २०२५ प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

## सेवालयाच्या विद्यार्थ्यांनी पटकावली ३१ पारितोषिके

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२२: महाराष्ट्र शासनाच्या महिला बालविकास विभागाने बाभळगावच्या पोलीस प्रशिक्षण मैदानावर घेतलेल्या चाचा नेहरू बाल महोत्सवात हासेगावच्या सेवालयातील एचआयव्ही एड्स संक्रमित विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारांत बक्षिसांची अक्षरशः लूट केली. विविध प्रकारांमध्ये तब्बल ३१ पारितोषिके पटकावली आहेत.

या महोत्सवात जिल्ह्यातील इतर बालगृहांतील बालकांनी देखील सहभाग नोंदविला होता. यात सेवालय प्रकल्पातीलच मुले एचआयव्ही एड्स संक्रमित आहेत. या महोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात सेवालय बालगृहातील ही एचआयव्ही एड्स संक्रमित बालके विशेष होती. तरीही सर्वांपेक्षा वरचढ कला प्रकार सादर

सेवालयाचे प्रमुख प्रा. रवी बापटले यांच्या मार्गदर्शनात सेवालयातील विद्यार्थ्यांना अष्टपैलू बनण्याचे धडे सेवालयात दाखल होताच मागील २० वर्षापासून देण्यात येत आहेत. येथील विद्यार्थी शेतातील कामांसह शाळेतही उच्च गुणवत्ता निर्माण करीत आहेत. अनेक विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी नीटचीही तयारी करीत आहेत. विद्यापीठ युवक महोत्सवात अनेक विद्यार्थी राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचले आहेत. सेवालयाच्या हॅप्पी म्यूझिक शोचे दूरदर्शनवरही सादरीकरण झाले आहे. दरवर्षी बाल महोत्सवात पारितोषिकांची लूट करण्यात सेवालयाचेच विद्यार्थी अग्रभागी असतात.

अन्य बालगृहातील सामान्य बालकांसोबत विविध स्पर्धा करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके पटकावली आहेत. त्यात १३ प्रथम पारितोषिके पटकावली. यामध्ये बुद्धिबळ, सामूहिक नृत्य, एकल गायन, रांगोळी, लांब उडी, धावणे, संगीत खुर्ची, चित्रकला, लिंबू चमचा, दोरी उडी या कलांचा समावेश होता. याच विद्यार्थ्यांनी तब्बल ९ पारितोषिके द्वितीय क्रमांकाची पटकावली आहेत. त्यात धावणे, रिले, थाळीफेक, दोरी उडी, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, निबंध स्पर्धा या क्रीडा प्रकारांचा समावेश होता.

तृतीय क्रमांकाची तीन पारितोषिके तब्बल ९ पटकावली आहेत. त्यामध्ये संगीत खुर्ची, दोरी उडी, लिंबू चमचा, फॅन्सी ड्रेस, सामूहिक नृत्य यांचा समावेश होता. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक बनावे : पोनि. शिंदे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ : सायबर गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी सतर्क राहा, अनोळखी लिंक उघडू नका, संशयास्पद फोन कॉल्स किंवा मेसेजकडे दुर्लक्ष करा. बँक तपशील, पासवर्ड, ओटीपी किंवा इतर कोणतीही वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर करू नका. कारण, यातून तुमची फसवणूक होऊ शकते. विद्यार्थ्यांनी जागरूक राहून जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी केले.

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात सायबर क्राईम, महिला सुरक्षा आणि व्यसनमुक्ती या विषयांवर मार्गदर्शन करत गुरुवारी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये,संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य प्रा. कविता केंद्रे, संस्थेच्या संचालक अश्विनी केंद्रे, स्वाती घुले यांच्यासह वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते यांची

## आमदार पवारांनी दिली निष्ठावंताना उमेदवारीची पावती

# पक्षासाठी काम करणाऱ्यांनाच संधी

तभा वृत्तसेवा

औसा दि. २२ जानेवारी - होवू घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर उमेदवार निवडीतून पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना आ. अभिमन्यू पवार यांनी प्राधान्य देत राजकीय वर्तुळात स्पष्ट आणि ठोस संदेश दिला आहे. पक्ष संघटन, निष्ठा आणि तळागाळातील कार्यकर्त्यांचा सन्मान या त्रिसूत्रीवर या निवडणुकीसाठी उमेदवारीची रचना केली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

औसा विधानसभा मतदारसंघातील १२ जिल्हा परिषद व २४ पंचायत समिती अशा एकूण ३६ उमेदवारांपैकी तब्बल ३० उमेदवार पक्षाचे जुने, निष्ठावान कार्यकर्ते आहेत. ४ उमेदवार नव्याने पक्षात प्रवेश केलेले आहेत, तर केवळ १ उमेदवार अराजकीय पार्श्र्वभूमीचा आहे. या निवडीतून पक्षासाठी काम



करणाऱ्यांनाच संधी असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.

पक्षाच्या पहिल्या फळीतील संतोष मुक्ता, काकासाहेब मोरे, ज्ञानेश्र्वर वाकडे, परमेश्र्वर धुमाळ, युवराज बिराजदार, अजय साळुंके, भागवत कांबळे, दिगंबर घोडके आणि शिवशरण पाटील या नऊ प्रमुख व अनुभवी कार्यकर्त्यांच्या दीर्घकालीन निष्ठेला न्याय देण्यात आला आहे. त्यामुळे पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून संघटन अधिक मजबूत होत आहे.

याचबरोबर रवीकुमार चिलमे, श्रीधर जाधव, राम बिराजदार, अमोल पाटील, नेताजी इंगळे, बालाजी माने यांच्यासह दहा पेक्षा अधिक युवा कार्यकर्त्यांना उमेदवारी देत आ. अभिमन्यू पवार यांनी नव्या पिढीलाही नेतृत्वाची संधी दिली आहे. यामुळे पक्षात नवचैतन्य निर्माण झाले असून तरुण कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

भाजपमध्ये बूथ यंत्रणेला अत्यंत महत्त्वाचे स्थान मानले जाते. त्याच धर्तीवर सदाशिव स्वामी आणि प्रतीक पाटील यांच्यासारख्या बूथ पातळीवर सातत्याने आणि निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. 'कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा आधार आहे' हे या निवडीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अशा या मजबूत संघटनाच्या जोरावर पक्ष अधिक आत्मविश्र्वासाने निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# मोबाईल हिसकावून नेणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २२ जानेवारी : लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांनी धडाकेबाज कामगिरी करत मोबाईल हिसकावून नेणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. चोरट्यांकडून तब्बल ४ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**लातूर शहरात मोबाईल चोरी व मोबाईल हिसकावून नेण्याच्या घटनांवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे मार्गदर्शनात एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या पथकाने केलेली ही कारवाई अत्यंत उल्लेखनीय ठरली आहे. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही विश्र्लेषण, गोपनीय माहिती आणि जलद कारवाईच्या जोरावर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत गुन्हा उघडकीस आणत आरोपींना जेरबंद केले असून, मोठ्या प्रमाणावर चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक बाळासाहेब विष्णु डोंगरे हे मॉर्निंग वॉक ला गेले असता अज्ञात चोरटयांनी मोटारसायकलवरून येऊन त्यांचा मोबाईल हिसकावून नेला होता. या घटनेने चोरटे आता पोलिसांनाही सोडत नाहीत असे बोलले जात होते.**

**या चोरी प्रकरणी विकास बाळु राठोड,**



**प्रजापती मुरलीधर सोनवणे यांच्यासह आणखी एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. या आरोपींकडून बाळासाहेब डोंगरे यांचा हिसकावून नेलेला मोबाईल, इतर १६ मोबाईल फोन (किंमत अंदाजे २,५०,०००/- रुपये), गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, मोबाईल लॉक तोडण्यासाठी वापरण्यात आलेला कॉम्प्युटर संच असा एकूण सुमारे ४ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**तसेच आरोपींनी यापूर्वीही अशाच प्रकारचे अनेक गुन्हे केल्याची कबुली दिली असून, जप्त करण्यात आलेल्या मोबाईलच्या आधारे संबंधित मोबाईल धारकांचा शोध घेऊन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यामुळे शहरातील अनेक मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा होण्याची दाट शक्यता आहे.**

**ही संपूर्ण कारवाई एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चवरे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि खंदारे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश पोगुलवार, डीबी पथकाचे सपोउपनि बेल्लाळे, पोलीस अमलदार भोसले, हस्के, जाधव, डोंगरे यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.**

### निवडणूक रणधुमाळीला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

वलांडी **दि. २२ जानेवारी :** देवणी तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. २२) उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया शांततेत पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पूर्ण झाली. छाननीअंती जिल्हा परिषदेचे दोन तर पंचायत समितीचे १७ असे एकूण १९ उमेदवारी अर्ज अपात्र ठरले आहेत.

देवणी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तीन जागांसाठी एकूण २९ उमेदवारांनी ३६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीनंतर त्यापैकी दोन अर्ज अपात्र ठरले असून २७ अर्ज वैध ठरले आहेत. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसणे व तांत्रिक त्रुटी ही अपात्रतेची प्रमुख कारणे असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



## पुलवामा हल्ल्यावर आधारित देशभक्तीपर चित्रपट लवकरच मोठ्या पडद्यावर

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ जानेवारी-**

देशभक्तीच्या भावनेला केंद्रस्थानी ठेवत, दहशतवादी हल्ल्यांमुळे सामान्य नागरिकांच्या आयुष्यावर होणारा परिणाम आणि त्यानंतर भारतीय लष्कराकडून दिला जाणारा निर्णायक प्रतिसाद या मुद्द्यांवर आधारित चित्रपट 'द रिटर्न ऑफ द आर्मी मॅन' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नय्युम खान एंटरटेनमेंट प्रस्तुत हा हिंदी व तेलुगू भाषेतील चित्रपट ६ फेब्रुवारी रोजी जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. पुलवामा दहशतवादी हल्ल्यात अतिरेकी गटाकडून मारल्या गेलेल्या एका नागरिकाच्या कथेवर आधारित हा सिनेमा असून, या घटनेनंतर देशभरात निर्माण झालेला रोष, भावनिक तणाव आणि लष्कराची रणनीतिक भूमिका प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. संवेदनशील विषयाला सिनेमॅटिक फ्रेमवर्कमध्ये सादर करताना, हा चित्रपट भावनिक एंगेजमेंटसोबतच राष्ट्रभावना अधिक बळकट करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. चित्रपटाचे दिग्दर्शन बाबू भट्ट यांनी केले असून, त्यांच्या परिपक्व दिग्दर्शकीय दृष्टीकोनामुळे कथा अधिक परिणामकारक ठरते. या आयकॉनिक ॲक्शन ड्रामामध्ये गोविंद नामदेव, मनोज जोशी, प्रभाकर (बाहुबली फेम) यांच्यासह शालिनी चव्हाण, शाबास खान, ज्ञानप्रकाश, मुकेश भट्ट, लोकेश शर्मा, अमित शर्मा, मोनिका बंगाळ, दीपक चौबे आदी कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसणार आहेत. मजबूत स्टारकास्ट, प्रभावी कथा आणि देशभक्तीचा ठोस संदेश यामुळे 'द रिटर्न ऑफ द आर्मी मॅन' हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक व्हॅल्यू-ड्रिव्हन सिनेमॅटिक अनुभव ठरण्याची शक्यता आहे.



## एमजीएम नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतली रुग्णसेवेची शपथ

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ -**

एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, मदर तेरेसा कॉलेज ऑफ नर्सिंग व कॉलेज ऑफ नर्सिंग, गांधेली येथील नव्या सत्रातील विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा आज रुक्मिणी सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा, उपअधिष्ठाता डॉ. प्रविण सूर्यवंशी, प्रकल्प संचालिका डॉ. प्रेरणा दळवी, प्राचार्य डॉ. सतीशचंद्र बोईटे, प्राचार्या डॉ. विद्याराणी यूमनम, प्राचार्या कमलजित कौर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पारस मंडलेचा यांनी नर्सिंग हे केवळ व्यवसाय नसून सेवाभावी व सन्माननीय क्षेत्र असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, निष्ठा व सेवाभाव जपावा, असे आवाहन केले. एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण, संवेदनशीलता व संशोधनशील दृष्टिकोनावर भर दिला. अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा यांनी हा सोहळा विद्यार्थ्यांच्या करिअरमधील महत्त्वाचा टप्पा असल्याचे नमूद केले. फ्लॉरेन्स नाईटिंगल यांच्या परंपरेनुसार विद्यार्थ्यांनी दीपप्रज्वलन करून रुग्णसेवेची शपथ घेतली. ही शपथ उपप्राचार्या डॉ. अमरजा गोसावी यांनी दिली. यावेळी वार्षिक अहवाल प्राचार्य डॉ. सतीशचंद्र बोईटे, प्राचार्या डॉ. विद्याराणी यूमनम व प्राचार्या कमलजित कौर यांनी सादर केला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. विश्वनाथ बिरादार यांनी केले, सूत्रसंचालन उज्वला साळवे व रितिषा श्रीसुंदर यांनी केले, तर आभार प्रा. अलिशिबा भोसले यांनी मानले.

## स्कोडाची अपडेटेड कुशाक बाजारात दाखल

**छत्रपती संभाजीनगर, २२ -**




स्कोडा ऑटो इंडियाने इंडिया २.० धोरणांतर्गत अपडेटेड कुशाक भारतीय बाजारात दाखल केली आहे. मूल्य, सुरक्षितता आणि गतिशीलतेवर भर देणारी ही एसयूव्ही युरोपियन अभियांत्रिकी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या कंपनीच्या धोरणाला बळ देते. आठ-स्पीड टॉर्क कन्व्हर्टर ऑटोमॅटिक गिअरबॉक्स, पॅनोरॅमिक सनरूफ, रेअर सीट मसाज, एआय-समर्थित इन्फोटेनमेंट आणि २५ हून अधिक स्टँडर्ड सुरक्षा वैशिष्ट्ये या गाडीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. १५ हजार प्री-बुकिंग सुरू असून, मार्च २०२६ अखेर डिलिव्हरीला प्रारंभ होणार आहे.

# तालुक्यातील जि.प ९ गट तर पं.स १८ गणांसाठी होणार निवडणूक

## निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज : तालुक्यात २ लक्ष ४८ हजार ८७४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार

**तभा वृत्तसेवा । गजानन मरकड**
**सिल्लोड, दि. २२ जानेवारी-**

दि ५ फेब्रुवारी गुरुवारी होणाऱ्या जि प पंचायत समिति निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासन सज्ज झाले आहे.

तालुक्यातील जिल्हा परिषद ९ गट आणि पंचायत समिती १८ गणांच्या निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज असल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी निलेश अपार व तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी संजय कुमार देवराय यांनी दिली.

गट आणि गणाचे मिळून आजपर्यंत ७७ जणांनी निवडणूक अर्ज घेऊन गेले आहे तर दि १७ शनिवारी पानवडोद पंचाय समिति गणासाठी एक अर्ज प्राप्त झाला असल्याची माहिती दिली.

तालुक्यात या निवडणुकीसाठी २ लक्ष ४८ हजार ८७४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.


तालुक्यातील जिल्हा परिषदच्या अजिंठा,शिवना, उंडणगांव, घाटनांद्रा,डोंगरगाव, भराडी,अंधारी, केऱ्हाळा, अंभई या ९ गटांसाठी तसेच पंचायत समितीच्या या अजिंठा, हळदा,शिवना,पानवढोद बुद्रुक, उंडणगांव, हट्टी,अंभई,केळगाव,घाटनांद्रा,आमठाना,पालोद,डोंगरगाव,भराडी,धानोरा,केऱ्हाळा,निल्लोड, अंधारी, बोरगांव सारवाणी या १८ गणांसाठी मतदान होणार असून या निवडणुकीमध्ये स्त्री एकूण २ लक्ष ४८ हजार ८७४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. या निवडणुकीसाठी ३०५ मतदान केंद्र तयार करण्यात आली असून ३० क्षेत्रीय अधिकारी व प्रत्येक केंद्रावर कक्ष मतदान अधिकारी १ व एफपीओ १ तसेच मतदान अधिकारी ३ कर्मचारी राहतील या सर्व ३०५ केंद्रासाठी १४०० कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून याव्यतिरिक्त पोलीस प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी राहतील.

### ॲपवरुन नाव शोधता येणार

या निवडणुकीत चा वापर होणार असून विधानसभेच्या मतदार यादीत १ जुलै २०२५ रोजी नाव असलेल्या मतदारांना या निवडणुकीत मतदान करता येईल. 'मताधिकार' या मोबाइल ॲपवरुन मतदारांना त्यांचं नाव मतदार यादीत शोधता येईल.

### प्रचारासाठी मिळनार कमी अवधी

जि प पंचायत समितीच्या निवडणूक प्रचारासाठी केवळ आठ दिवस मिळाल्याने पुढाऱ्यांची मोठी धावपड होणार आहे.अजून देखील अनेक पक्षाचे उमेदवार घोषित झालेले नाही त्यातच कमी अवधी त्यातच गट गनातील प्रत्येक मतदारापर्यंत जाऊन भेट घेण्यासाठी अगदी तारेवरची कसरत पुढाऱ्यांना करावी लागनार आहे.२७ जानेवारी ला उमेदवारी अर्ज परत घेण्याची मुदत आहे तर ३ फेब्रुवारपर्यन्त प्रचार करण्याची मुभा उमेदवारांना आहे यामुळे केवळ आठ दिवस प्रचार करण्यास मिळाल्याने प्रत्येक मतदारापर्यन्त पुढाऱ्यांना पोहचने शक्य होणार नसल्याने काही पुढारी निवडणूक विभागाच्या नावाने बोटे फोड़तांना दिसत आहे.




### जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक

राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छुक असलेल्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु जात वैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केल्यास अन्य कोणताही पुरावा सादर करणे आवश्यक राहील. निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवाराची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द केली जाईल.

### प्रशासनाची करडी नजर

निवडणूक म्हंटले की कार्यकर्त्यांना लुभावन्यासाठी नेते मंडळीकडून कार्यकर्त्यांसाठी रात्री सोमरस,जेवनावळ्या ची उत्तम व्यवस्था केलेली असते तसेच मतदानासाठी नोटांचा महापुर वाहायला लागतो या सर्व प्रकारावर प्रशासनाची करडी नजर असून असे प्रकार आढळल्यास नेते व कार्यकर्त्यांना याचा फटका बसु शकतो.

### असा आहे निवडणूक कार्यक्रम

या निवडणुकांसाठी १६ जानेवारी पासून अर्ज भरायला सुरुवात होईल आणि २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याचदिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर करणं, मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होईल. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीच्या गणासाठी एक अशी दोन मते द्यावे लागतील.

# शिवसेनेचे मंत्री असलेल्या जिल्ह्यांमध्येच निवडणूक निकालात सुमार कामगिरी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ जानेवारी-**

महापालिका निवडणुकीमध्ये शिवसेनेचे मंत्री असलेल्या जिल्ह्यांमध्येच पक्षाची कामगिरी असमाधानकारक झाली आहे. त्यामुळे संबंधिताकडून कामाचा अहवाल मागविला जाणार असल्याची सूत्रानं माहिती दिली.

राज्यातील २९ महापालिकांमध्ये एकूण २,८६९ जागांसाठी १५,९०० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी सर्वाधिक म्हणजे १,४२५ भाजपाचे नगरसेवक निवडून आले आहेत. तर दुसऱ्या क्रमांकावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ३९९ नगरसेवक निवडून आले आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेची कामगिरी ठाणे, कल्याण डोंबिवली या महापालिकांमध्ये चांगली राहीली असली तरी मुंबईसह राज्यभरात कामगिरी असमाधानकारक आहे. ठाण्यासह कल्याण डोंबिवलीत शिवसेनेला चांगले यश- राज्यात शिवसेनेचे ५५ आमदार आहेत. महापालिका निवडणुकीसाठी प्रत्येक जिल्ह्याची जबाबदारी संबंधित मंत्री आणि आमदारांवर सोपवली होती. ठाणे हा शिवसेनेचा (शिंदे) बालेकिल्ला आहे. त्यामुळे ठाण्यातील यश अपेक्षित होते. त्याचबरोबर कल्याण डोंबिवलीतही शिवसेनेची कामगिरी ही भाजपापेक्षा चांगली राहीली. असे असलेतरी इतर महापालिकांमध्ये शिवसेना पिछाडीवर गेल्याचं चित्र आहे. यामुळे शिंदे हे जबाबदारी दिलेल्या मंत्र्यांवर नाराज असल्याची माहिती आहे.मंत्र्यांच्या जिल्ह्यांमध्येच शिवसेनची कामगिरी सुमार- विशेष म्हणजे, ज्या मंत्र्यांकडे महत्त्वाच्या महापालिकांची जबाबदारी सोपवण्यात आली होती, तिथेच पक्षाची कामगिरी अत्यंत सुमार राहिल्याचे निकालांतून स्पष्ट झाले.

### या मंत्र्यांची सुमार कामगिरी :

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे जबाबदारी असलेल्या मुंबई महापालिकेत २२७ पैकी शिवसेनेला अवघ्या २९ जागांवर समाधान मानावं लागले. मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मीरा-भाईंदर महापालिकेत ९५ पैकी फक्त ३ जागा वाट्याला आल्या. नाशिकमध्ये मंत्री दादा भुसे यांच्याकडं जबाबदारीवर असतानाही १२२ पैकी केवळ २६ जागांवर शिवसेनेला विजय मिळविता आला. तर छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्री संजय शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेला ११५ पैकी फक्त १३ जागा मिळाल्या आहेत.

**अहवाल मागवून तंबी देणार-** अपेक्षित यश मिळवू न शकलेल्या जिल्ह्यांतील मंत्र्यांच्या कामगिरीची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेतल्याची माहिती आहे. निवडणुकीत पक्षाची कामगिरी सुमार ठरल्यानं जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरलेल्या मंत्र्यांचा कामगिरी अहवाल मागवून तंबी देणार असल्याची माहिती आहे. महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये पक्ष काही ठिकाणी दुसऱ्या क्रमांकावर राहिला असला, तरी निवडणुकीत अपेक्षित यश साधता न आल्यानं नेतृत्व अस्वस्थ आहे.

**मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा मागवला जाणार-** महत्त्वाचं म्हणजे, महापालिका निवडणुकांपूर्वीच एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना निवडणुकीत चांगली कामगिरी करण्याबाबत स्पष्ट इशारा दिला होता. जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महापालिका निवडणुका या शिवसेनेच्या मंत्र्यांसाठी पक्षबांधणीच्या दृष्टीनं परीक्षा ठरणार असल्याचं पक्षांतर्गत स्पष्ट करण्यात आलं होतं. मात्र, या कसोटीत अपयशी ठरलेल्या मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा मागवला जाणार असल्याचं सूत्रानं सांगितलं आहे.

**ही अंतर्गत बाब-** जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी पक्षसंघटन बळकट करण्याची जबाबदारी सोपवण्यासाठी पुन्हा नव्यानं आढावा घेऊन नेत्यांची निवड केली जाणार आहे. याबाबत ईटीव्ही भारतशी बोलताना खासदार नरेश म्हस्के म्हणाले, ''पक्ष संघटनेबाबतची भूमिका उपमुख्यमंत्री एकनाथ त्या नेत्यांकडे स्पष्ट करतील. ही अंतर्गत बाब आहे. याबाबत जो विचार करायचा, तो शिंदे साहेब करतील. पण, मंत्रिमंडळातील भाकरी फिरवण्याबाबतची माहिती मला नाही. माझा मंत्रिमंडळाशी कोणताही संबंध नाही. त्याबाबत मी बोलणं उचित ठरणार नाही.'' एकंदरीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर शिवसेनेत मोठ्या फेरबदलांची चाहूल लागली आहे. महापालिका निवडणुकीत समाधानकारक कामगिरी न झाल्यानंतर मंत्रिमंडळातही भाकरी फिरवली जाणार का? याकडंही सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## राष्ट्रीय पर्यटन दिनानिमित्त कलाकारांकडून पर्यटन आठवणींना उजाळा

**छत्रपती संभाजीनगर, दि २२-**

राष्ट्रीय पर्यटन दिनाच्या पार्श्वभूमीवर एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय मालिकांतील कलाकारांनी आपल्या पर्यटनप्रेमाचा आणि संस्मरणीय प्रवासाचा अनुभव शेअर केला. 'घरवाली पेडवाली'मधील जीतूची भूमिका साकारणारे पारस अरोरा यांनी बरेली ते नैनीताल बाइक ट्रिपचा उल्लेख करत निसर्गाशी जोडणारा अनुभव सांगितला. 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा यांनी वाराणसीतील घाट, गंगा आरती आणि आध्यात्मिक शांततेचे महत्त्व अधोरेखित केले. तर 'भाबीजी घर पर है २.०'मधील अंगूरी भाबी शिल्पा शिंदे यांनी अलिबाग, अजिंठा-वेरूळ, महाबळेश्वर तसेच कर्जत येथील फार्महाऊसला आपल्या मनातील खास स्थान असल्याचे नमूद केले.

निसर्ग, संस्कृती, अध्यात्म आणि वैविध्यपूर्ण अनुभवांनी समृद्ध असलेले पर्यटन जीवनात ऊर्जा व समतोल देणारे असल्याचा समान सूर कलाकारांनी व्यक्त केला. ही धमाल पाहण्यासाठी 'हप्पू की उलटन पलटन' रात्री ९.३०, 'घरवाली पेडवाली' रात्री १० आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर प्रसारित होतात. तसेच सर्व भाग हिंदी झी ५ वर उपलब्ध आहेत.



## २६ जानेवारी निमित्त सामुहिक राष्ट्रगीताचे होणार वर्ड रेकॉर्ड

**तभा वृत्तसेवा**
**पैठण दि २० जानेवारी -**

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली दशसूत्री कार्यक्रमाअंतर्गत ''संस्कार दशसूत्रीचे,रंग राष्ट्रभक्तीचे.''

''संस्कारातून राष्ट्रभक्तीकडे,या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकाच वेळी लाख २५ हजार विद्यार्थी सामुहिक राज्यगीत,राष्ट्रगीत व संगीत कवायत मध्ये सहभागी होणार आहेत.ज्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ड रेकॉर्डमध्ये होणार आहे. ज्यामध्ये पैठण तालुक्यातील दहा हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत.या निमित्त पैठण पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी मनोज चव्हाण यांनी पंचायत समिती हॉल येथे सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षक यांची बैठक घेऊन तालुक्याचे नियोजन केले.यावेळी मार्गदर्शन करतांना त्यांनी सांगितले की पैठण तालुक्यात प्रशाला मुले, कावसानकार स्टेडियम, भीमाशंकर विदयालय सरस्वती भुवन विद्यालय बिडकीन,जवाहर विदयालय पाचोड अश्या ५ ठिकाणी दहा हजार विद्यार्थी सामुहिक कवायत होणार आहे. बैठकीला शिक्षण विस्तार अधिकारी रंगनाथ आढाव, कार्यालयीन अधीक्षक सतीश आखेगावकर, कार्यक्रमाचे समन्वयक समशेर पठाण, शिवाजी राठोड, बाळकृष्ण मुळे, उत्तम खरात, बळीराम भुमरे, अंकुश गाढे, संजय लसगरे, झारगड, कुलकर्णी, सेवनकर, गायकवाड आदी उपथित होते.

# न्याय सहाय्यक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय!

## मुख्यमत्र्यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२२ जानेवारी -**

सर्वांसाठी न्याय.. जलद न्याय या तत्वावर राज्य शासन काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाने जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायदान साखळीतील कमतरता दूर करण्यात येत आहे. नवीन फौजदारी कायद्याअंतर्गत जलद न्यायाला प्राधान्य दिले असून त्यानुसार न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे.

न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडे निकाले काढण्यासाठी फडणवीस यांनी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार संचालनालयकडील प्रयोगशाळांमध्ये २०२५ या वर्षांत एकूण १ लाख ८१ हजार प्रकरणे प्रलंबित होती. तसेच २ लाख ९४ हजार नवीन प्रकरणे आली होती. त्यापैकी डिसेंबर २०२५ अखेर ३ लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. सद्या ७९ हजार ५४२ प्रकरणे प्रलंबित आहेत.

विशेष मोहिमेअंतर्गत सर्व विभागांच्या प्रचलित मानकांमध्ये वाढ करून संचालनालयातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांचेकडून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत कामाचे जादा तास वाढवून, शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. संचालनालयातील कार्यरत मनुष्यबळाकडून कमीत कमी २ लाख ते २ लाख १५ हजार प्रकरणांचा निपटारा करण्याची क्षमता असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार ३ लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. प्रलंबित प्रकरणांपैकी १ लाख ०२ हजार ४१३ इतक्या जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यात संचालनालयाला यश आले आहे.

डिसेंबर २०२५ अखेर प्रलंबित प्रकरणांपैकी कन्व्हेक्शनल फॉरेन्सीक या विभागाने ३ लाख ९६ हजार २७५ इतक्या प्रकरणांचा निपटारा केला आहे. तसेच या विभागात २७ हजार ५२४ आवक प्रकरणांची संख्या असून फेब्रुवारी २०२६ पासून ज्या दिवशी प्रकरण आवक होईल, त्याच दिवशी प्रकरणांचे विश्लेषणाचे काम सुरू होईल, त्यामुळे दिवसेंदिवस प्रकरण प्रलंबित असण्याची बाब इतिहासजमा होऊन पिडीतांना जलदगतीने न्याय मिळण्याची व्यवस्था निर्माण होत आहे. संगणक गुन्हे विभाग, सायबर, ध्वनी व ध्वनीफित विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटाराही जलदगतीने करण्यात येत आहे.

न्यादान प्रक्रिया जलद झाल्यामुळे पीडितांना वर्षानुवर्षे न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही. गतिमान न्याय दान करण्यासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाची महत्त्वाची भूमिका आहे. राज्यातील प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

दि.कि. अर्ज क. ७९६/२०२५
पु.ता.२८/०१/२०२६

**साखराबाई बाबुराव लोणकर,**
वय ८५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. नेवरगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद — **अर्जदार**

विरूध्द

**गैरअर्जदार - निरंक**

**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, आशाबाई कडुबाळ सोनवणे हे नेवरगांव ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होती ती दि.१६/०९/२०२४ रोजी नेवरगांव ता. गंगापुर येथे मयत झाली असून तिचे पुर्वी तिचे पती कडुबाळ जनार्धन सोनवणे हे दि. ०४/०८/२०१८ रोजी पखोरा ता. गंगापूर येथे मयत झाले आहे आणि या दोघांचा एकमेव मुलगा नामे भुषन कडुबाळ सोनवणे हा दि. ०८/०६/२०१२ रोजी मयत झाला असून तो विद्यार्थी होता व अविवाहीत होता. मयत नामे आशाबाई काडुबाळ सोनवणे यांना अर्जदार ही आई असून या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत आशाबाई काडुबाळ सोनवणे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारास हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे. त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर, गंगापूर**

## अग्रलेख...

# नव्या भाजपाध्यक्षांना शुभेच्छा देताना...

''भाजप असा पक्ष आहे, ज्यात पद नाही तर प्रक्रिया महत्त्वाची असते. मी पंतप्रधान असलो तरी, जेव्हा विषय पक्षाचा येतो तेव्हा मी एक सामान्य कार्यकर्ता असतो आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माझे 'बॉस' असतात...'', देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे वक्तव्य भारतीय जनता पार्टीच्या शिस्तबद्ध, संयमी आणि त्यागाच्या संस्कृतीची मांडणी करणारे आहे. शिवाय या राजकीय पक्षाच्या 'डीएनए'चा तो मूलाधारही आहे. ज्यांनी अनेक दशके हा देश घराणेशाहीच्या दरबारी संस्कृतीने चालवला आणि आता पक्षाला उभारी देणेही ज्यांच्यासाठी अशक्यप्राय होऊन बसले आहे, अशा काँगेस पक्षाच्या नेतृत्वासाठी मोदींचे हे विधान मोलाची शिकवण ठरावी, असेच आहे. इतरांनाही त्यापासून शिकता येईल. पंतप्रधान म्हणून तीन कार्यकाळ गाजवणारी, एव्हाना जगप्रसिद्ध झालेली व्यक्ती स्वतःला सामान्य कार्यकर्ता समजून आपल्या नव्या पक्षाध्यक्षांपुढे नतमस्तक होते, तेव्हा तो पक्ष सर्वांपेक्षा वेगळा ठरतो आणि सध्याच्या राजकीय संस्कृतीत नवलाईचा विषय पण ठरतो. या संस्कृतीमुळेच भाजपची अन्य कुठल्याही राजकीय पक्षांशी तुलना होऊ शकत नाही.

अगदी सामान्य कार्यकर्ता हा राज्यकर्ता होऊ शकतो आणि सतरंजी उचलणाराही पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष बनू शकतो, यात भाजपचे वेगळेपण दिसते. यालाच 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणतात. काँग्रेससारख्या पक्षात जिथे नेतृत्वासाठी रक्ताचे नातेच अनिवार्य मानले जाते, तिथे भाजपात पद नाही तर प्रक्रिया महत्त्वाची ठरते. भाजपात अंतर्गत लोकशाही केवळ कागदावर नाही, तर प्रत्यक्ष कृतीत दिसते. हा पक्ष 'व्यक्ति'केंद्रित नसून 'विचार'धार्जिणा आहे आणि म्हणूनच रामनाथ कोविंद, द्रौपदी मुर्मू यांचे नाव ध्यानीमनी नसतानाही ते थेट देशाचे प्रथम नागरिक म्हणजे राष्ट्रपती होतात. ओम बिर्ला लोकसभेचे सभापती होतात. हरिवंश नारायण सिंह राज्यसभेचे उपाध्यक्ष होतात. त्या अर्थाने राजकीय पृष्ठभूमी नसलेले मनोहरलाल खट्टर, भजनलाल शर्मा हे मुख्यमंत्री होतात. एस. जयशंकर, अश्विनी वैष्णव यांच्यासारखे प्रशासकीय क्षेत्रातले लोक अचानक देशाच्या मंत्रिपदी पोहोचतात. अत्यंत मार्मिक उदाहरण पाहायचे झाल्यास, रेल्वेस्थानकावर चहा विकणारी व्यक्ती या देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान होते, ते या पक्षाच्या गौरवशाही व तत्त्वनिष्ठ वारशामुळेच. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी ज्या भारतीय जनसंघाची स्थापना केली, त्याचे मूळ 'एक देश, एक विधान, एक निशान' या राष्ट्रप्रेमी विचारात होते. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी दिलेला अंत्योदयाचा विचार आजही या पक्षाचा अढळ मार्गदर्शक स्तंभ आहे. अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी या जोडगोळीने शून्यातून या पक्षाचे विश्व उभे केले. त्यामुळेच १९८४ मध्ये लोकसभेत केवळ २ जागा मिळवणारा हा पक्ष २०१४ मध्ये २८२ आणि २०१९ मध्ये ३०३, तर २०२४ येईपर्यंत २४० जागांसह सलग तिसऱ्यांदा सत्तेत येणारा विक्रमी पक्ष ठरला. १८ कोटींहून अधिक नोंदणीकृत सदस्यांसह भाजपने चीनच्या कम्युनिस्ट पार्टीलाही मागे टाकत अवघ्या जगात सर्वांत मोठा राजकीय पक्ष म्हणून नावलौकिक मिळवला. आज भारतातील २० राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे किंवा त्यांच्या मित्रपक्षांचे सरकार आहे. ईशान्येकडील सातही राज्यांमध्ये केलेली प्रगती हे या पक्षाच्या संघटनकौशल्याचे उत्तम उदाहरण आहे. देशातील १० लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर 'पन्ना प्रमुख' आणि 'बुथ समिती'ची रचना आणखी कुठल्याच पक्षाकडे नाही, हे भाजपचे बलस्थान आहे. हे सगळे अगदी सहज होत नाही, तर त्यासाठी त्याग आणि समर्पणाची मोठी परंपरा लागते. कुशाभाऊ ठाकरे यांच्यासारखे अध्यक्ष, ज्यांनी आयुष्यभर साधी सायकल वापरली आणि पक्षाचा विस्तार केला, त्यांचे आदर्श प्रेरणादायी आहेत. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, डॉ. मुरलीमनोहर जोशी, जना कृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, अमित शाह आणि जे. पी. नड्डा यांच्या परिश्रमातूनच नितीन नवीनसारख्या तरुण नेतृत्वाकडे या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा आली. मोठी नावे बाजूला सारून जेव्हा 'नवीन' युग येते तेव्हा त्यात पिढी बदलाचे संकेत असतात. एकदा अटलबिहारी वाजपेयी यांना विचारण्यात आले होते की, तुमच्यानंतर कोण? तेव्हा त्यांनी हसून सांगितले, हा पक्ष कार्यकर्ते चालवतात, नेतृत्व आपोआप उदयाला येते!

पण याचा अर्थ असाही नाही की, भारतीय जनता पक्षात सारेच 'आलबेल' आहे. खरे तर, ज्यांना या संस्कृतीचा आधार नाही अशी अन्य पक्षांतील माणसं ज्या वेगाने या पक्षात घुसत आहेत, तेवढ्याच वेगाने दोषही शिरत आहेत. मूळ कार्यकर्त्यांची अस्वस्थता, आलेल्यांचा सत्तापद मिळवण्यासाठीचा गोंधळ, उमेदवारीचे नकार पचवण्याची ताकद नसल्याने उफाळून येणारी बंडखोरी ही 'आयाराम' संस्कृतीचीच देण आहे. नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीतून ती चव्हाट्यावर आलेली दिसते. भ्रष्टाचाराचे मूळ घेऊन आलेल्यांमुळे भाजपाचे मूळ 'कॅडर' अस्वस्थ आहे. निवडणूक आता विचारांची राहिली नाही, तर पैशांची झाली आहे असे त्यांना वाटते. ज्यांच्या विरोधात आम्ही लढलो, त्यांच्याच सोबत आता काम करावे लागते, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये दिसू लागली आहे. अनेक ठिकाणी शिस्तीला तडे जात आहेत. जेव्हा बाहेरच्या पक्षातून नेते येतात, तेव्हा ते आपली जुनी कार्यपद्धतीदेखील सोबत आणतात. त्याचा नकारात्मक परिणाम भाजपवर होत आहे हे नाकारता येत नाही. सत्ता टिकवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी केलेली ही तडजोड राजकारण म्हणून मान्य करता येईल; पण त्यामुळे पक्षाच्या नैतिक अधिष्ठानाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते, याचा विचार भाजपच्या कर्त्याधर्त्यांनी केला पाहिजे. एक खरे की राजकारणाच्या रीतीभाती बदलत असतानाही, भाजप इतर पक्षांच्या तुलनेत आजही अधिक संयमी आणि देशहिताचा विचार करणारा पक्ष आहेच. याची काही महत्त्वाची कारणे आहेत. या पक्षात कोणीही कितीही मोठा नेता आला तरी, संघटनेचे त्याच्यावर अदृश्य पण कडक नियंत्रण असते. पक्षाचा कणा आजही तोच निष्ठावंत कार्यकर्ता आहे, जो कोणत्याही पदाच्या अपेक्षेविना 'भारत माता की जय' म्हणत कामाला लागतो. सत्तेत असूनही आपल्या नातलगांना पद न देणारे नेते हे कार्यकर्त्यांपुढे 'रोल मॉडेल' ठरतात. हे लोक सुटी न घेता सतत काम करतात. हा त्याग कार्यकर्त्यांना प्रेरणा देतो. अन्य पक्षांच्या तुलनेत भाजप आजही 'सेल्फ-करेक्शन' करण्याची मोठी ताकद ठेवतो. जेव्हा केव्हा देशहिताचा प्रश्न येतो, तेव्हा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला सारून 'राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी मी' हा विचार या पक्षात अद्याप जपला जातो. ३७० कलम हटवणे असो वा राम मंदिराचे निर्माण, पक्षाने आपल्या मूळ विचारधारेशी कधी मोठी तडजोड केली नाही. पक्षाची अशी अनेक बलस्थाने असताना, बाहेरून येणाऱ्या 'आयाराम' नेत्यांमुळे मूळ विचारांना गालबोट लागणार नाही, याची काळजी नव्या पिढीतील नेतृत्वाला घ्यावी लागेल. सत्तेच्या झगमगाटात कार्यकर्त्याचा त्याग आणि संयम ढळणार नाही हेही जपावे लागेल. नितीन नवीन यांच्यासारख्या युवा नेतृत्वाकडून हीच अपेक्षा आहे की, त्यांनी पक्षाला केवळ 'इलेक्शन विनिंग मशीन' न करता, त्याला देशकार्याला वाहून घेतलेली 'संस्कारांची शाळा' बनवावे. शेवटी भाजपचे यश हे केवळ आकड्यांत नाही, तर आजवर जपलेल्या राजकीय सुसंस्कृतीत आहे.

नितीन नवीन यांच्यासारख्या तरुण आणि अभ्यासू नेतृत्वावर विश्वास टाकणे, हे भाजपच्या प्रवाहीपणाचे लक्षण आहे. तसेच नवीन नेतृत्वाला संधी देताना जुन्या अनुभवांची शिदोरीही सोबत ठेवणे हीसुद्धा या पक्षाची खासियत आहे. भारतीय राजकारणात अनेक पक्ष आले आणि गेले, पण विचारांशी प्रामाणिक राहून जनसामान्यांच्या हृदयात स्थान मिळवणारा भाजप हा एकमेव पक्ष ठरला आहे, यात वाद नाही. घराणेशाहीच्या दलदलीतून देशाला बाहेर काढून, विकासाच्या राजकारणाकडे नेण्याचे श्रेय याच पक्षाला जाते. 'त्याग, संयम आणि देशहित' हा भाजपचा मूळ आत्मा असून, तो अजून शाबूत आहे. जोपर्यंत भाजपचा प्रत्येक नेता पंतप्रधान मोदींप्रमाणेच मी आधी भाजपचा सामान्य कार्यकर्ता आहे, असे अभिमानाने म्हणत राहील तोपर्यंत या पक्षाची संस्कृती आणि श्रेष्ठत्व अबाधित राहील. त्यासाठी सतत प्रयत्न व्हावेत आणि निवडणुकीतील लौकिक यशासह नैतिक अधिष्ठानाचा विस्तार सतत होत राहो, अशीच कोट्यवधी भाजप कार्यकर्त्यांची भावना आहे. तिला दुजोरा देताना भाजपच्या नव्या अध्यक्षांना शुभेच्छा!

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# 'राईट टू डिस्कनेक्ट' साधणार समतोल

भारतात गेल्या दोन दशकांमध्ये माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विस्तार झाला. लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध झाला, जागतिक दर्जाचे वेतन, कामाचे उत्तम वातावरण आणि करीअरची उत्कृष्ट संधी मिळाली. परंतु या चमकत्या जगामागे एक वास्तव लपले आहे. कार्यालयीन काम आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल साधणे हे आज प्रत्येक भारतीय आयटी कर्मचाऱ्यापुढील अत्यंत महत्त्वाचे आव्हान बनले आहे. जगभरातील क्लायंट्सना सेवा देण्याची गरज, वेळेत प्रोजेक्ट डिलिव्हरीची अपेक्षा, टाईम झोनचा ताण, सतत बदलणारी तंत्रज्ञानाची मागणी आणि कठोर डेडलाईन्स यामुळे या क्षेत्रातील कामाचे स्वरूप पूर्वीपेक्षा खूपच तणावपूर्ण झाले आहे. अनेक कर्मचाऱ्यांचा दिवस ९ तासांऐवजी ११ ते १२ तासांपर्यंत वाढतो. 'वर्क फ्रॉम होम' हा उपक्रम सुरू झाल्यावर प्रवासाच्या तासांची बचत झाली असली तरी काम संपण्याची सीमा अस्पष्ट झाली आणि 'काम नेमके कधी संपते?' हा प्रश्न निर्माण झाला. भारतामध्ये आयटी उद्योगाची रचना विशिष्ट समस्या घेऊन येते. बहुतेक ग्राहक अमेरिकन/युरोपियन असल्याने रात्री बेरात्री कॉल्स, मोठ्या शहरांमधील वाहतुकीचा प्रचंड बोजा, ऑफिसला जाण्या-येण्यामध्ये अनेक तास जाणे, कामगिरी मोजमापाची स्पर्धात्मक पद्धत, कुटुंबीयांची अपेक्षा, अधिक पैसे मिळवण्यासाठी चांगले पद, जास्त तास काम करून 'सेटल' होण्याचा सामाजिक दबाव, तंत्रज्ञानाच्या वेगवान बदलामध्ये सतत शिकण्याची गरज, कोर्सेस/सर्टिफिकेशन्स यासाठी द्यावा लागणारा अतिरिक्त वेळ या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे कामाचा ताण आणि वैयक्तिक आयुष्यातील असंतोष.

या पृष्ठभूमीवर काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल का आवश्यक आहे, हे समजून घेण्याची गरज आहे. मानसिक आरोग्याची जपणूक, सततची धावपळ, ऑन-कॉल सपोर्ट, मीटिंग्जचा मारा यामुळे बर्नआऊट, चिंता, चिडचिड, झोपेच्या समस्या निर्माण होतात. शारीरिक स्वास्थ्य, तासन्‌तास स्क्रीनसमोर बसणे, व्यायामाची कमतरता यामुळे पाठदुखी, लठ्ठपणा, मधुमेह, बिघडता रक्तदाब आदी व्याधी वाढण्याचे प्रमाण वाढते. कौटुंबिक जीवन, लग्न, मुले, पालक, समाजकार्य या गोष्टींसाठी वेळ उरत नाही. घरातील नाती संघर्षमय होऊ लागतात. म्हणूनच काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल साधल्यास काम अधिक एकाग्रतेने आणि कमी ताणात होऊ शकते. 'बर्नआऊट'च्या समस्येमुळे अनेक जण नोकरी बदलतात; पण योग्य दैनंदिन जीवनात समतोल ठेवल्यास दीर्घकालीन करीअर घडते. कार्यकालीन काम आणि वैयक्तिक आयुष्यातील समतोल म्हणजे कामाच्या जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक गरजा, कुटुंब, आरोग्य तसेच सामाजिक जीवन यामध्ये संतुलन राखणे. कामाचे तास वाढतात आणि विश्रांतीला वेळ मिळत नाही, तेव्हा हा समतोल बिघडतो. विशेषतः इंटरनेट, फोन वर्किंग आणि 'वर्क फ्रॉम होम'सारख्या प्रथा पूर्वी फक्त आयटी उद्योगात होत्या. त्या आता इतर उद्योगांमध्येही प्रचलित आहेत. हा विषय सध्याच्या कॉर्पोरेट जगतात खूप महत्त्वाचा आहे, विशेषतः केरळमध्ये समोर आलेल्या 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयकाच्या पृष्ठभूमीवर त्याची विशेष चर्चा झाली.

मुळात कुणी किती काम करायचे, त्याचे मूल्यमापन (पगार) हे जिकिरीचे विषय आहेत. स्मार्टफोन, ई-मेल आणि मेसेजिंग ॲप्समुळे कर्मचाऱ्यांनी कामाच्या वेळेनंतरही उपलब्ध राहणे अपेक्षित असते. यामुळे कामकाजाच्या वेळेच्या सीमा अस्पष्ट होतात. अनेक कंपन्यांमध्ये, खास करून खाजगी क्षेत्रात, जास्त तास काम करणे हे समर्पणाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर जास्त वेळ काम करण्याचा अघोषित दबाव असतो. ऑक्टोबर २०२३ मध्ये इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती यांनी एका पॉडकास्टमध्ये केलेल्या विधानामुळे मोठा वाद निर्माण झाला. त्यांनी भारतीय तरुणांना आठवड्यातून ७० तास काम करण्याचा सल्ला दिला. त्यांनी म्हटले की, भारताला चीनसारख्या देशांशी स्पर्धा करून मोठी प्रगती करायची असेल, तर जर्मन आणि जपानी लोकांनी दुसऱ्या महायुद्धानंतर जसे केले, त्याचप्रमाणे उत्पादकता वाढवण्यासाठी भारतीय तरुणांनी खूप कष्ट केले पाहिजेत. त्यांनी स्वतः इन्फोसिसच्या सुरुवातीच्या काळात दर आठवड्याला ७० तासांपेक्षा जास्त काम केल्याचे सांगितले. मूर्ती यांच्या विधानानंतर काही महिन्यांनी 'लार्सन ॲण्ड टुब्रो' या कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यन यांच्या एका अंतर्गत बैठकीतील वक्तव्यामुळे आणखी मोठा वाद निर्माण झाला. सुब्रमण्यन यांनी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून ९० तास काम करण्याची सूचना दिली. त्यांनी म्हटले. 'मला तुम्हाला रविवारी काम करायला लावता येत नाही, याचे दुःख आहे. तुम्हाला रविवारी काम करायला लावल्यास मला जास्त आनंद होईल, कारण मी स्वतः रविवारी काम करतो.'

सुब्रमण्यन यांनी नंतर स्पष्ट केले की, त्यांची टिप्पणी अनौपचारिक बैठकीत करण्यात आली होती आणि ते कंपनीचे धोरण नव्हते. एकंदर काय, तर कार्यकालीन काम, ताणतणाव, सुट्टी, कुटुंबाबरोबर घालवलेले क्षण (ज्यामुळे तणाव कमी होतो, मानसिक आरोग्य सुधारते) हे सर्व कळीचे मुद्दे आहेत. बहुराष्ट्रीय उद्योगात ग्राहक परदेशी असतो तिथे वेळेच्या फरकामुळे अनेकदा रात्री बेरात्रीही काम करावे लागते. ही कार्यसंस्कृती आणि कार्यालयाला जायला लागणारा वेळ (त्यात ट्रॅफिक जॅम) या बाबींमुळे जास्त पगार असणाऱ्या आयटीमधील नोकऱ्या अनेकांना नकोशा वाटत आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्ये केरळने 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल सादर केले. कामाच्या ठिकाणी आरोग्यपूर्ण सीमा जपण्यासाठी ते एक लहान पण महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे विधेयक कर्मचाऱ्यांना कार्यालयाच्या वेळेनंतर कामाशी संबंधित संवादापासून 'स्विच ऑफ' करण्याचा कायदेशीर अधिकार देते. केरळ विधानसभेत औपचारिकपणे सादर कर्तण्यात आलेले हे बिल विधिमंडळाच्या विचारासाठी सादर करण्यात आले. सध्या, हे विधेयक विधानसभेत तपासणीखाली असून ते समिती पुनरावलोकन, सुधारणा आणि मतदानाच्या अधीन आहे. ते कायद्यात रूपांतरित झाल्यास कामगार विभागाने अधिसूचित केलेल्या विशिष्ट नियमांनुसार लागू होऊ शकते. तसे झाल्यास केरळ हे 'राईट टू डिस्कनेक्ट' लागू करणारे भारतातील पहिले राज्य ठरेल. सध्या आयटी उद्योग प्रामुख्याने बंगलोर, चेन्नई, हैदराबाद, पुणे, गुरगाव अशा शहरांमध्ये केंद्रित आहे. त्यामुळे इतर राज्यांवरही या घटनेचा प्रभाव पडू शकतो. अर्थात या कायद्याची अंमलबजावणी कशी करणार हा देखील एक मोठा प्रश्न आहे. त्यातच सध्या आयटी क्षेत्रात खूप अनिश्चितता आहे. नोकरी टिकवणे अनेकांना जास्त महत्त्वाचे वाटत आहे. भारतीय आयटी उद्योगाने तरुणाईला उत्तम कारकीर्दीची संधी दिली असली तरी कामाचा ताण, डेडलाईन्सचा दबाव, तंत्रज्ञानाची शर्यत आणि घरकामाचा गोंधळ यामुळे गमावलेली मनःशांती ही आजची सर्वांत मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे आयुष्यात समतोल साधण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन, व्यायाम, मानसिक शांतता तंत्र, छंद जोपासणे आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर आवश्यक आहे. कंपन्यांनीही लवचीक वेळापत्रक, हायब्रिड मॉडेल, वास्तववादी डेडलाईन्स आणि मानसिक आरोग्य कार्यक्रम देणे गरजेचे आहे. असा समतोल साधणे केवळ कंपनीची जबाबदारी नाही; तर कर्मचारी, कुटुंब, व्यवस्थापन आणि समाज यांच्या सामूहिक प्रयत्नांवर ते अवलंबून आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

विजय कुळकर्णी

# जिल्हा परिषद शाळांचे सामाजिक अंकेक्षण

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागांतर्गत राबविल्या जात असलेल्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचे सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट) ८ जानेवारीपासून सुरू झाले आहे. पहिल्या टप्प्यात करण्यात येत असलेल्या सामाजिक अंकेक्षणात अमरावती, बुलढाणा, वर्धा, पुणे, अहिल्यानगर इत्यादी जिल्ह्यांतील शाळांचा समावेश आहे. जागतिक बँक आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या पारदर्शक कामकाजासाठी 'सोशल ऑडिट' (सामाजिक अंकेक्षण) अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळेला मिळणारा निधी, खर्च, राबवल्या जाणाऱ्या योजना आणि शैक्षणिक गुणवत्ता यांची माहिती समाजासमोर म्हणजे पालक आणि ग्रामस्थांपुढे ठेवून त्याचे मूल्यमापन करणे म्हणजे सोशल ऑडिट. शालेय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणणे,

शालेय पोषण आहार, मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेश वाटपाची खातरजमा करणे, शाळेच्या भौतिक सुविधा म्हणजे स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, इमारत यांची पाहणी करणे, निधीचा विनियोग नियमानुसार झाला आहे की नाही हे तपासणे. हा मुख्य उद्देश या अंकेक्षणामागे आहे.



आपण नेहमी शालेय पोषण आहारात घोळ, पोषण आहारातील तांदूळ बाजारात विकला, शालेय पोषण आहारात अळ्या आढळल्या, इत्यादी प्रकारच्या बातम्या वाचतो, ऐकतो. या अंकेक्षणात शालेय पोषण आहारातील त्रुटी शोधून त्या दुरुस्त करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, शाळेतील भौतिक सुविधा म्हणजे पायाभूत सुविधांची कमतरता, स्वच्छता, विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृह, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, आरोग्यदायी वातावरण आहे की नाही याची तपासणी केली जाणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या दिवसेंदिवस खालावत आहे. तेव्हा, पालक व विद्यार्थ्यांना पुन्हा जि. प. शाळेकडे वळविण्यासाठी अशाप्रकारचे अंकेक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे. राज्यातील ६५ हजार शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या लाभांचे या उपक्रमात अंकेक्षण होणार आहे. महाराष्ट्र शिक्षण परिषदेने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व सामाजिक पारदर्शकता सोसायटीसोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार २०२५-२०२६ मध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील १३ हजार शाळांचे सोशल ऑडिट होणार आहे. शाळास्तरावरील अंकेक्षण झाल्यावर दोन दिवसांत गट स्तरावर जनसुनावणी होणार आहे. त्याची तारीख, वेळ, स्थळ याबाबतची माहिती संबंधित अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, पालक व शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना कळविण्यात येणार आहे. या अंकेक्षण प्रक्रियेचे राज्य समन्वयक म्हणून राहुल जोगदंड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अशाप्रकारे जिल्हा परिषद शाळांचे सामाजिक अंकेक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण, ग्रामीण भागातील शाळांमध्ये अनेकदा गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येते. काल परवाच इगतपुरी तालुक्यातील करंजवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एक घृणास्पद प्रकार उघडकीस आला. तिसऱ्या वर्गात शिकणाऱ्या बालिकेवर त्याच शाळेतील एका शिक्षकाने तब्बल आठ महिने अत्याचार केला. अर्थात आता या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली. त्या नराधमाला पोलिसांनी अटक केली. तर, दुसरी घटना सिन्नरमध्ये घडली. एका इंग्रजी शाळेतील दुसऱ्या वर्गातील विद्यार्थिनीचा एका शिक्षकाने विनयभंग केला. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना रोखण्यासाठी व विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी सोशल ऑडिट महत्त्वाचे ठरते. तसेच, शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या सुदृढ असला पाहिजे. कारण सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करते. त्यासाठी शासनाने शालेय पोषण आहार सुरू केला. पण, त्यातही गैरप्रकार होतात. हे निश्चितच भूषणावह नाही. या सर्व बाबींवर नियंत्रण मिळविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने सोशल ऑडिट सुरू केले आहे. या अंकेक्षणाचा अहवाल शासनाला प्राप्त झाल्यावर त्यात दर्शविण्यात आलेल्या त्रुटी, उपाय योजनांची शासनाने दखल घेऊन जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या तरच, या सामाजिक अंकेक्षणाचे फलित मिळेल, एवढे नक्की!

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# नितीन नवीन यांच्या नेतृत्वाचा कस

भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांनी मंगळवारी सूत्रे स्वीकारली. भाजपचेच नाही तर देशातील सर्व राष्ट्रीय पक्षातील सर्वांत तरुण अध्यक्ष म्हणून त्यांच्या नावाची नोंद झाली आहे. भाजप जेवढा तरुण तेवढेच त्याचे राष्ट्रीय अध्यक्षही तरुण आहेत, योगायोग म्हणजे दोघेही एकाच वयाचे म्हणजे ४५ वर्षांचे आहेत. भाजप हा पार्टी विथ डिफरन्स म्हणून ओळखला जातो, म्हणजे भाजप हा देशातील अन्य राष्ट्रीय पक्षांपेक्षा आचार, विचार आणि कृतीने वेगळा पक्ष आहे. आपल्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड करताना भाजपने हे दाखवून दिले.

भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे, तर काँग्रेस हा नेत्यांचा. त्यामुळे काँग्रेसमध्ये आजपर्यंत एकाही कार्यकर्त्याची पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली नाही, तर कोणत्या तरी मोठ्या त्यातही गांधी घराण्यातील नेत्याच्या गळ्यातच अध्यक्षपदाची माळ टाकण्यात येते. गांधी घराण्यातील नेता अध्यक्ष होत नसेल तर त्या घराण्याच्या चरणी आपली निष्ठा वाहणाऱ्या नेत्याला अध्यक्ष केले जाते. पण भाजपमध्ये नितीन नवीन यांच्यासारख्या तळागाळातील, तसेच पक्षाच्या समर्पित आणि प्रामाणिक नेत्याची पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. एवढेच नाही तर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन हेच संघटनात्मक बाबतीत माझे 'बॉस' असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे हे माझे बॉस असल्याचे विधान कधी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या तोंडून कोणाला ऐकू आले नाही. काँग्रेसमध्ये खडगे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी पक्षात त्यांचे स्थान सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा यांच्यानंतर चौथ्या क्रमांकावर आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. त्या पृष्ठभूमीवर नितीन नवीन हेच माझे बॉस हे मोदी यांचे विधान उठून दिसणारे आहे. राष्ट्रीय राजकारणात नसणारे पण पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झालेले नवीन हे नितीन गडकरी यांच्यानंतर दुसरे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यांच्या तुलनेत गडकरी हे तेव्हा राष्ट्रीय राजकारणात नसले तरी चर्चित व्यक्तिमत्त्व होते. देशातील लोक त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून महाराष्ट्रात केलेल्या कामासाठी ओळखत होते. योगायोग म्हणजे अध्यक्ष होण्याआधी गडकरी यांच्याप्रमाणे नितीन नवीनही बिहारमध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री होते. नितीन गडकरी शिवसेनेचे मनोहर जोशी यांच्या मंत्रिमंडळात तर नबीन हे जदयुचे नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. म्हणजे दोन्ही नेते मित्रपक्षाच्या नेतृत्वातील युतीच्या मंत्रिमंडळात होते.



१९८० मध्ये भाजपची स्थापना झाल्यापासून नितीन नवीन भाजपाचे अध्यक्ष म्हणून पंधरावे तर व्यक्ती म्हणून बारावे अध्यक्ष आहेत. जगतप्रकाश नड्डा यांच्याकडून नवीन यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली. जानेवारी २०२० ला नड्डा यांची भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. सलग सहा वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवणारे नड्डा हे अटलबिहारी वाजपेयी आणि अमित शाह यांच्यानंतरचे तिसरे नेते आहेत. १९८० मध्ये भाजपाची स्थापना झाल्यानंतर अटलबिहारी भाजपाचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष झाले. १९८० ते १९८६ असे सलग सहा वर्षे वाजपेयी यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. विशेष म्हणजे वाजपेयी यांनी नंतर सहा वर्षे देशाचे पंतप्रधानपदही यशस्वीपणे सांभाळले. देशाचे पंतप्रधान झालेले वाजपेयी हे भाजपाचे आतापर्यंतचे तरी एकमेव अध्यक्ष आहेत. नरेंद्र मोदी सलग अकरा वर्षांपासून देशाचे पंतप्रधान आहेत, पण ते भाजपाचे अध्यक्ष कधी नव्हते. लालकृष्ण अडवाणी देशाचे उपपंतप्रधान झाले, पण पंतप्रधानपदाने त्यांना नेहमीच हुलकावणी दिली. भाजपाचे सर्वाधिक काळ अध्यक्षपद भूषवण्याचा बहुमान लालकृष्ण अडवाणी यांच्या नावावर आहे. अडवाणी यांनी तीन कार्यकाळ मिळून अकरा वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. तर सर्वांत कमी काळ भाजपाचे अध्यक्षपद सांभाळण्याचा विक्रम बंगारू लक्ष्मण आणि जना कृष्णमूर्ती यांच्याकडे आहे.

१९८६ ते १९९१ अशा पहिल्या कार्यकाळात अडवाणी पाच वर्षे भाजपाचे अध्यक्ष होते. दुसऱ्या कार्यकाळात १९९३ ते १९९८ असे आणखी पाच वर्षे अध्यक्ष होते. अडवाणी यांचा भाजप अध्यक्ष म्हणून तिसरा कार्यकाळ २००४ ते २००५ असा एक वर्षाचा होता. डॉ. मुरलीमनोहर जोशी १९९१ ते १९९३ असे दोन वर्ष भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. १९९८ ते २००० अशी दोन वर्षे कुशाभाऊ ठाकरे भाजपाचे अध्यक्ष होते. बंगारू लक्ष्मण आणि जना कृष्णमूर्ती सर्वांत कमी कार्यकाळ म्हणजे प्रत्येकी एक वर्ष भाजपाचे अध्यक्ष होते. बंगारू लक्ष्मण यांनी २००० ते २००१ तर जना कृष्णमूर्ती यांनी २००१ ते २००२ या काळात भाजपाचे अध्यक्षपद सांभाळले. २००२ ते २००४ या काळात व्यंकय्या नायडू भाजपाचे अध्यक्ष होते. व्यंकय्या नायडू यांनी नंतर देशाचे उपराष्ट्रपतिपदही भूषवले. उपराष्ट्रपतिपदाची जबाबदारी सांभाळणारे नायडूही भाजपाचे एकमेव अध्यक्ष आहेत. २००५ ते २००९ असे चार वर्ष राजनाथसिंह भाजपाचे अध्यक्ष होते. २००९ ते २०१३ असे चार वर्ष नितीन गडकरी यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. २०१३ ते २०१४ असे नंतर एक वर्ष पुन्हा राजनाथसिंह भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. २०१४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने राजनाथसिंह यांच्या नेतृत्वात लढवली आणि देशाच्या इतिहासात प्रथमच स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळवले. २०१४ ते २०२० असे सलग सहा वर्ष अमित शाह यांनी भाजपाचे अध्यक्षपद सांभाळले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी अमित शाहच भाजपाचे राष्ट्रीय होते. या निवडणुकीत भाजपाने स्वबळावर दुसऱ्यांदा बहुमत मिळवले. अमित शाह यांच्यानंतर जगतप्रकाश नड्डा यांच्याकडे भाजपाचे अध्यक्षपद आले. २०२४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने नड्डा यांच्या अध्यक्षपदाच्या काळात लढवली, पण या निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळवता आले नाही. भाजपाचा विजयरथ २४० वर अडकला.

२०२९ ची लोकसभा निवडणूक भाजपा नितीन नवीन यांच्या नेतृत्वात लढवणार हे निश्चित आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळवून देण्याचे आव्हान नवीन यांच्यासमोर राहणार आहे. हे शिवधनुष्य ते यशस्वीपणे पेलतील यात शंका नाही. पण त्याला अजून तीन वर्ष आहेत, त्याआधी या वर्षात तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांत विधानसभा निवडणूक होणार आहे. या दोन राज्यांत आतापर्यंत भाजपाला कधीच सत्ता मिळाली नाही. त्यामुळे या राज्यात भाजपाला सत्तेवर आणण्याचे आव्हान नवीन यांच्यासमोर आहे, यातच त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी या दोन राज्यांतील निवडणूक नवीन यांना भाजपाला कोणत्याही स्थितीत जिंकून द्यावी लागणार आहे.

९८८१७१७८१७

## विचारांना चालना देणारा कुटुंब प्रबोधन विशेषांक

विद्याभारती विदर्भ द्वारा नुकताच प्रकाशित झालेला संस्कार साधनाचा कुटुंब प्रबोधन हा विशेषांक कुटुंब संस्थेचे महत्त्व नव्याने आणि अधिक व्यापक स्वरूपात मांडणारा आहे असे जाणवले. शिक्षण व संस्काराच्या माध्यमातून समाज घडणीचे कार्य करणाऱ्या विद्या भारतीने या विशेषांकातून आजच्या काळाची नाडी अचूक ओळखली आहे. बदलत्या सामाजिक वास्तवात दुर्लक्षित होत चाललेल्या कुटुंब मूल्यांवर या अंकातील सर्वच लेख प्रकाश टाकतात आणि विचार प्रवृत्त करतात. यातील लेख केवळ वैचारिक मांडणीपुरते मर्यादित न राहता कुटुंब संस्थेचे सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक महत्त्व समजावून सांगतात. कुटुंब हे संस्काराचे प्रथम केंद्र असून समाज सुदृढतेचा पाया आहे ही भावना संपूर्ण अंकातून प्रभावीपणे व्यक्त होते. आधुनिक जीवनातील आव्हाने, नातेसंबंधातील बदल आणि त्यावर उपाययोजनांची दिशा या सर्व बाबींचे समतोल व सकारात्मक चिंतन यातील लेखांतून घडते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंच परिवर्तन संकल्पनेतील एक महत्त्वाचा घटक म्हणून कुटुंब प्रबोधन या विषयावर वैचारिक व व्यवहार्य दर्शन घडविणारा हा विशेषांक कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्या सुदृढतेसाठी विचार करणाऱ्यांनी वाचावा. कुटुंबातील सर्व सदस्यांसह वाचावा आणि त्यातील विचार जीवनात उतरवावेत असे वाटते.

**वसंत ढवळे**/नागपूर

## वाचक पत्रे

## विविध ठिकाणची वसंत पंचमी

वसंत पंचमी म्हणजे माघ महिन्यात शुक्ल पंचमीला साजरा होणारा सण! या दिवशी वसंत ऋतूचे आगमन होते. ज्ञान व कलेची देवी सरस्वतीची पूजा केली जाते. याला श्रीपंचमी असेही म्हणतात. हा दिवस देवी सरस्वतीचा जन्मदिवस मानला जातो. अशी मान्यता आहे की सृष्टी रचयिता ब्रह्माने जेव्हा जीव आणि मनुष्यांची रचना केली, तेव्हा ब्रह्माने आपल्या संसाराकडे बघितले. त्यांना सगळीकडे निर्जन असल्याचे जाणवलं. वातावरण अगदी शांत होतं ज्यात कुठलीही वाणी नव्हती. हे बघून ब्रह्मा उदास आणि असंतुष्ट झाले. ब्रह्मांनी प्रभू विष्णूच्या आज्ञेने आपल्या कमंडलूतून पाणी घेऊन पृथ्वीवर शिंपडले. धरतीवर पडलेल्या त्या पाण्यामुळे पृथ्वीवर कंपन झाले आणि एक अद्‌भुत शक्तीच्या रूपात चतुर्भुजी अर्थात चार भुजा असलेली एक सुंदर स्त्री प्रकट झाली. त्या देवीच्या एका हातात वीणा, दुसऱ्या हात वरमुद्रेत म्हणजे वर देणारा आणि इतर दोन हातांत पुस्तक आणि माळ होती. ब्रह्माने त्या स्त्रीला वीणा वाजवण्याचा आग्रह केला. वीणेच्या सुरांमुळे पृथ्वीवरील सर्व जीव-जंतूंना वाणी प्राप्त झाली. त्या क्षणानंतर या देवीला सरस्वती असे म्हटले गेले. त्या देवीने वाणीसह विद्या आणि बुद्धी दिली. म्हणून वसंत पंचमी देवी सरस्वतीच्या जन्मोत्सवच्या रूपात साजरी केली जाते. या देवीला वागीश्वरी, भगवती, शारदा, वीणावादनी आणि वाग्देवी यासह अनेक नावे आहेत. संगीताची उत्पत्ती केल्यामुळे तिला संगीताची देवी म्हणून देखील पूजलं जातं. या दिवशी सरस्वती देवीला नैवेद्य दाखवण्यासाठी भारतात विविध प्रांतात बुंदीचे लाडू, नारळाची बर्फी, केशरी राजभोग, विविध प्रकारची भजी असे पदार्थ केले जातात.

पेशव्यांच्या काळात हा उत्सव महाराष्ट्रात उत्साहाने साजरा होत असे. या दिवशी लोक आपल्या नातेवाईकांना फुलांचा किंवा हिरव्या देठाच्या धान्याच्या कणसांचा गुच्छ भेट म्हणून देत असत. बाजीराव पेशवे हा उत्सव आपल्या सरदारांसोबत साजरा करायचे. केशरी रंगाची उधळण केली जात असे. ब्राह्मण, शास्त्री आणि अन्य सन्माननीय व्यक्तीला भोजन व कलावंतिणीचे नृत्य असे स्वरूप असे. मथुरा, वृंदावन, राजस्थान या भागात वसंत पंचमीच्या दिवशी गणपती, इंद्र , शिव आणि सूर्य यांची प्रार्थना केली जाते. बंगाल प्रांतात या दिवशी भक्तिगीते म्हणत प्रभातफेरी काढली जाते. हिवाळा संपून वसंत ऋतूचे आगमन होते. झाडांना, वृक्षांना, वेलींना नवी पालवी फुटते. त्यामुळे आनंदाचे वातावरण असते. लोक पिवळ्या किंवा गुलाबी रंगाचे वस्त्र परिधान करतात कारण हे रंग वसंत ऋतूचे आणि पिवळ्या मोहरीच्या फुलांचे प्रतीक आहेत. वसंत पंचमी ही कृषी संस्कृतीशी संबंधितही आहे. या दिवशी नवान्न इष्टी असा एक छोटासा यज्ञ करतात. शेतात तयार झालेल्या नवीन पिकांच्या ओंब्या, कणसं देवाला अर्पण करतात. वसंत म्हणजे आशा आणि सिद्धीचा सुंदर मिलाप आहे. आपणही या वसंत ऋतूचे स्वागत उत्साहात करूया.

**वंदना प्रमोद देशपांडे**/९४२२४४९७७

## रामलला प्राणप्रतिष्ठा त्रिवर्षपूर्ती

रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा तिसरा वर्धापनदिन २२ जानेवारी रोजी साजरा केला जाणार आहे. त्यात अजून एक शुभ शकुन म्हणजे श्री गणेश जयंती याच दिवशी आली आहे. त्यामुळे यावेळी एक अपूर्व योग साधला गेला आहे. अयोध्येतील राम मंदिर ही केवळ ऐतिहासिक कामगिरी नाही तर भारतीय संस्कृती आणि श्रद्धेचा देखील हा उत्सव आहे. गेल्या तीन वर्षात राम मंदिराने दर्शनार्थींच्या संख्येचे तसेच दिलेल्या दानाचे अनेक विक्रम मोडले आहेत. १ जानेवारीला दर्शन घेणाऱ्या भाविकांनी तर गेल्या काही वर्षांतील अनेक विक्रम मोडलेत. या सगळ्यामागे प्रभू श्रीरामांवर असलेल्या श्रद्धेचा, एकात्मतेचा प्रभाव आहे. रामलला प्राणप्रतिष्ठा दिवस हा दिवाळीप्रमाणे भव्य आध्यात्मिक पर्व असल्याप्रमाणे मानला जातो. या दिवसात सूर्य उत्तरायण कक्षेत असतो. माघ महिना हा शुभ आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जातो. सूर्याची ही स्थिती आत्मविश्वास, तेज आणि धर्माला मजबूत करते. म्हणून हा दिवसाचे खास आध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व आहे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर


# ...अहो आश्चर्यम्, सर्व वरपूडकर कुटूंबिय रिंगणात

## निष्ठावानांच्या हाती भोपळा, अनेक पक्ष केले मॅनेज, पत्नीलाही आणले मनपात निवडूण

## जिल्हा परिषद निवडणूक : मुलगा, सुन, मुलगी आणि पुतण्या आता गुलाल लावणार?

**परभणी,/प्रतिनिधी:** जसे राज्याच्या राजकारणात शरद पवारांच्या मनाचा ठाव कोणालाही घेता आला नाही त्याचप्रमाणे परभणीच्या राजकारणामध्ये माजी मंत्री सुरेश वरपूडकर यांच्या मनाचा ठाव कोणालाच लागला नाही. राजकारणामध्ये ते कधी कोणती भुमिका घेतील हे न समजण्यापलीकडे आहे. काँग्रेस मधून भाजपात आल्याबरोबर त्यांनी जवळपास भाजपाचाच ताबा घेतला.

महापालिकेची निवडणूक आपल्या हातात घेवून आपल्या सुविद्य पत्नी मिनाताई वरपूडकर यांना निवडूण तर आणले परंतू भाजपा मात्र भुईसपाट झाली. आता त्यांनी आपला मुलगा, सुन भाजपाकडून मुलगी उबाठाकडून व पुतण्यालाही निवडणूकीच्या रिंगणामध्ये आणले आहे. याचाच अर्थ असा की, वरपूडकर कोणत्याही पक्षाला मॅनेज करु शकतात. आता महौपार पद हे सर्वसाधारणसाठी





राखीव सुटल्यामुळे वरपूडकर या महापौरच्या निवडणूकीमध्ये आपले काही हातखंडे वापरुन चमत्कार घडवितात का हे पाहणे गरजेचे आहे.

या वरपूडकरांच्या सर्व खेळामध्ये मात्र भाजपाचा निष्ठावान कार्यकर्ता देशोधडीला लागला आहे. यामुळे आता जगात जर्मनी आणि भारतात परभणी तर परभणीत वरपूडकर अशी नवी म्हण काही दिवसांत अंमलात आल्याशिवाय राहणार नाही.


# संक्षिप्त वृत्त...

## जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात हजारो अर्ज दाखल

**जिंतूर,/प्रतिनिधी-** परभणी जिल्हा परिषदेसह पंचायत समिती अंतर्गत गटा-गणातील निवडणूकीतील उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतीम मुदतीत म्हणजे बुधवार २१ जानेवारी रोजी जिल्हा परिषद गटात पंचायत समिती गणात हजारो अर्ज दाखल झाले आहेत.

दरम्यान, इच्छुक उमेदवारांनी मंगळवारी सायंकाळपर्यंत २ हजार ८५३ कोरे नामनिर्देशनपत्र खरेदी केले होते. त्यापैकी जिल्हा परिषदेच्या गटात १४७ व पंचायत समिती गणात १६७ असे एकूण ३१४ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. बुधवारी शेकडो अर्जांची विक्री झाली अन् इच्छुक उमेदवारांनी मोठी धावपळ करीत मुदतीच्या आत उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान, त्या त्या ठिकाणी उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शने केली.

## सुधाकर हनवते यांनी.जि. प.गटतून उमेदवारी दाखल



**पालम,/प्रतिनिधी-** चाटोरी जि प गटातून अनुसूचित जाती मतदार संघातून सुघाकर हनवते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.या वेळी वैजनाथ हात्तीअंबिरे सखाराम लांर्ड, बालाजी दुधाटे, भागवत ऐडके इत्यादी उपस्थित होते.

## सोनपेठात संगीतमय शिव कथेची सांगता



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** शहरातील श्री विठ्ठल मंदिर (तेली समाज) संभाजीनगर येथे गेली आठ दिवसापासून सुरू असलेल्या परम रहस्य पारायण व संगीतमय शिव कथेची सांगता आज शुक्रवार रोजी प्रसादिक कीर्तनाने होणार आहे.या कथेचा व कीर्तनाचा भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या ४६५ व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त, येथील श्री विठ्ठल मंदिर (तेली समाज) संभाजीनगर, सोनपेठ येथे आयोजन करण्यात आले होते. श्री गुरुवर्य १०८ नंदिकीशोर शिवाचार्य महाराज, मठ संस्थान सोनपेठ यांच्या कृपाशीर्वादाने शुक्रवार, १६ जानेवारी ते २३ जानेवारी या काळात दररोज दुपारी २ ते ४ या वेळात संगीतमय शिव कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी कथाकार व कीर्तनकार शि.भ.प.श्री सतीश महाराज सायखेडकर यांच्या सुमधुर वाणीतून कथेचे निरुपण आठ दिवसापासून सुरू आहे. या कार्यक्रमाचे आयोजन समस्त वीरशैव लिंगायत समाज सोनपेठ यांच्या वतीने करण्यात आले आहे. आज या कार्यक्रमाची प्रासादिक किर्तनाने सांगता होणार असून त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. महाप्रसादाचे यजमान शिवहार म्हेत्रे,मथुराकांत म्हेत्रे, श्याम म्हेत्रे, मन्मथ म्हेत्रे हे असून भाविक भक्तांना प्रासादिक कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मानवत ग्रामीण रुग्णालयात पुन्हा चोरीचा अयशस्वी प्रयत्न

### संरक्षण भिंत तोडून केलेल्या रस्त्याने घडला प्रकार



**मानवत/प्रतिनिधी -** येथील ग्रामीण रुग्णालय परिसरात सलग दुसऱ्यांदा चोरीचा अयशस्वी प्रयत्न झाल्याची घटना दि. २१ जानेवारी रोजी उघडकीस आली. यापूर्वी कोविड सेंटरमधून एअर-कंडिशन काढण्याचा प्रयत्न झाल्यानंतर आता पुन्हा एका रूमचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न झाल्याने रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, गामीण रुग्णालयातील निवासस्थान परिसरातील एका बंगल्यात जागेअभावी पूर्वीचे सामान ठेवण्यात आले होते. दुपारी सुमारास महिलांना संशयास्पद आवाज आल्याने त्यांनी पाहणी केली असता काही जण रूमचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसले. त्यांनी आरडाओरडा केल्यानंतर संबंधित व्यक्ती पळून गेल्याचे सांगण्यात आले. रुग्णालय कर्मचाऱ्यांनी याबाबत सांगितले की, रुग्णालयाची संरक्षण भिंत फोडून काही व्यक्तींनी आत-बाहेर जाण्याचा 'शॉर्टकट रस्ता' तयार केला असून त्यातून मोटरसायकलसुद्धा वेगाने धावत असल्याने सुरक्षा धोक्यात आली आहे. रात्रीच्या पाळीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

## कुंभारी येथील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश कुंभारी येथे राष्ट्रवादीला खिंडार



**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद कौसडी सर्कलचे राष्ट्रवादीचे उमेदवार त्यांच्या गावातील कुंभारी येथील माजी सरपंच व इतर सदस्य व इतर जणांनी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर साहेब व भाजपचे जिल्हा परिषद कौसडी सर्कलचे उमेदवार प्रभाकर आप्पा यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टी प्रवेश केला आहे कौसडी सर्कल मध्ये राष्ट्रवादीच्या उमेदवाराला मोठा धक्का मानला जात आहे या प्रवेशामुळे प्रभाकर आप्पा वाघीकर यांची भक्कम बाजू झाली आहे.

तसेच उमेदवाराच्या गावातील राष्ट्रवादीला सुद्धा मोठा धक्का मानला जात आहे कुंभारी येथील माजी सरपंच दतराव हरकळ सुरेश हरकळ शिवशंकर चौधरी ग्रामपंचायत सदस्य भारत चौधरी ग्रामपंचायत सदस्य बालासाहेब हरकळ ज्ञानेश्वर दळवी संजय हरकर जगन्नाथ हरकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपमध्ये प्रवेश केला आहे यांच्या प्रवेश मुळे भाजपची ताकद कौसडी सर्कल मध्ये वाढणार आहे यावेळी बोलताना म्हणाली की परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री आणि माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर साहेब यांच्यावर विश्वास ठेवून आम्ही सर्व कुंभार येथील माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य भारतीय जनता पार्टी प्रवेश केलेला आहे व बोर्डीकर साहेब व पालकमंत्री यांच्या पाठीशी आम्ही सदैव राहणार आहे असे ते म्हणाले कुंभारी येथील माजी सरपंच म्हणाले की आम्ही प्रभाकर आप्पा वाघीकर यांना भरघोस मतांनी निवडून आणणार आहोत व परभणी जिल्ह्यात आमच्या कौसडी सर्कल चे उमेदवार प्रभाकर आप्पा वाघीकर यांना सर्वात जास्त मतांनी येणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले तसेच दोन्ही ग्रामपंचायत सुद्धा भाजपच्या जाणणारा असून आम्ही कुठल्याही भूलथापांना बळी न पडता पालकमंत्री व बोर्डीकर साहेब यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असे मत त्यांनी व्यक्त केले.



## श्रीमती तिरुमला मुकुंद खिल्लारे यांची एकमताने निवड

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी शहर महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या गटनेता निवडीसाठी आज परभणी महानगर कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रदेशाध्यक्ष मा.आ. श्री. रवींद्रजी चव्हाण साहेब, पालकमंत्री मा.ना. सौ. मेघनादीदी बोर्डीकर, संघटन मंत्री श्री. संजयजी कौडगे यांच्या सूचनेनुसार तसेच निवडणूक प्रमुख श्री. सुरेशराव वरपूडकर व श्री. रामप्रसाद बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे यांनी भूषविले.

या बैठकीत उपस्थित सर्व नगरसेवकांच्या एकमताने श्रीमती तिरुमला मुकुंद खिल्लारे यांची गटनेता म्हणून निवड करण्यात आली. या निवडीचा प्रस्ताव सूचक म्हणून डॉ. केदार लक्ष्मणराव खटिंग यांनी मांडला, तर प्रस्तावास श्री. रितेश कांतीलाल झांबड (जैन) यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्व नगरसेवकांनी टाळ्यांच्या गजरात या निवडीस संमती दर्शवली.

या बैठकीस सौ. तिरुमला मुकुंद खिल्लारे, सौ. वैशाली दत्तात्रय दैठणकर, सौ. सपना व्यंकटेश जुकटे, श्री. विश्वजीत बुधवंत, श्री. गणेश टाक, श्री. रितेश जैन, सौ. गिरीजा शंकर आजेगावकर, सौ. मीना सुरेशराव वरपूडकर, सौ. निर्मला बालासाहेब वाघमारे, सौ. सुशीला जिजाजी थोरात, श्री. अद्वैत सांगळे तसेच डॉ. केदार खटिंग हे नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

## आयशर टेम्पो उलटला; २ बैलांचा मृत्यू, दोन जखमी

**पालम,/प्रतिनिधी-** गोवंश जनावरांची निर्दयी व बेकायदेशीर वाहतूक केल्याप्रकरणी पालम पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत भरधाव वेगाने चालविण्यात आलेला आयशर टेम्पो शेतात उलटून दोन बैलांचा मृत्यू झाला असून, दोन बैल गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

फिर्यादी गणेश विश्वनाथ खोमणे पो. हेड कॉन्स्टेबल, पोलीस ठाणे पालम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी साजीत सईद शेख (२५, रा. मालेगाव, जि. नाशिक), शेख नाशेर शेख बुढान ऊर्फ भुऱ्या (रा. बोरगाव, ता. सितोर, जि. जालना) व सुलतान (पूर्ण नाव अद्याप स्पष्ट नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही घटना आज दुपारी ३.४३ वाजेच्या सुमारास गोविंद पिपळबले यांच्या शेतामध्ये, चाटोरी पालम येथे घडली. आरोपींनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील आयशर टेम्पो (एम.एच.२० इएल. ९८९८) मध्ये गोवंश जनावरांना एकत्र दाटीवाटीने, निर्दयपणे बांधून वाहतूक केली. हे वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालविल्यामुळे ते शेतात उलटले. या अपघातात दोन बैलांचा मृत्यू झाला असून, दोन बैल जखमी झाले आहेत.घटनास्थळी एकूण ११ बैल (जिवंत, जखमी व मृत) व गुन्ह्यात वापरलेला आयशर टेम्पो असा एकूण अंदाजे १३ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा गुन्हा सहायक पोलीस निरीक्षक मंजूषा मोरे यांच्या आदेशाने दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवकांत नागरगोजे हे करीत आहेत. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलीस हवालदार सारंग शहाणे यांनी पूर्ण केली. सध्या सर्व आरोपी पोलीसनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे.




## परभणी महानगरपालिकेचे महापौरपद खुले गटाकरीता आरक्षित

**परभणी,/प्रतिनिधी-** महानगरपालिके अंतर्गत महापौरपद हे सर्वसाधारण गटा करीता खूले झाले आहे. राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांतील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत गुरुवार २२ जानेवारी रोजी मुंबई येथे मंत्रालयात सकाळी ११ वाजता नगरविकास विभागाचे राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत काढण्यात आली

नुकत्याच राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुका पार पडल्या. शुक्रवारी मतमोजणी ही झाली. आता प्रतिक्षा होती ती महापौर पदाच्या आरक्षणाचीच. त्यामुळे आता उबाठा या पक्षास जास्त जागा मिळाल्या असल्यामुळे त्यांनाच आता महापौर पदाची बाजी मारण्यासाठी पुढे व्हावे लागेल आणि इच्छुकांची चाचपणी करावी लागेल.

## सविता मुरकुटे यांनी शक्तीप्रदर्शन करत पेठशिवणी सर्कल मधून उमेदवारी अर्ज दाखल

**पालम,/प्रतिनिधी :** - तालुक्यातील पेठशिवणी जिल्हा परिषद सर्कल हे ओबीसीसाठी राखीव असल्याने सर्कलमधून

यावेळी पेठशिवणी ते पालम अशी वाहनांची रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत कार्यकर्ते, ग्रामस्थ व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गंगाखेड विधानसभा मतदारसंघात सामाजिक कामाच्या माध्यमातून परिचित असलेले संतोषभाऊ मुरकुटे यांच्या सौभाग्यवती सौ. सविताताई मुरकुटे या भाजपच्या उमेदवार असून, त्यांनी पेठशिवणी सर्कलच्या विकासाबाबत आपली भूमिका मांडली.

या सर्कलमधील पाणी,वीज, रस्ते,आरोग्य व शिक्षण यासारख्या मूलभूत सुविधांबाबत काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.पेठशिवणी सर्कलचा सर्वांगीण



विकास व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त के ली. निवडणूक प्रक्रियेत सर्व जाती धर्मातील नागरिकांना सोबत घेऊन सकारात्मक विचारातून काम करण्याचा आपला प्रयत्न राहील, असे त्यांनी नमूद केले. यापूर्वी गंगाखेड विधानसभा मतदार संघातील विविध गावांमध्ये सामाजिक कामाच्या माध्यमातून संपर्क साधल्याचा अनुभव असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, पेठशिवणी जिल्हा परिषद सर्कलमध्ये उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणूक प्रक्रियेला वेग आला आसून परिसरात राजकीय हालचालीला सुरूवात झाली आहे.

## भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना भाजपचं कसं संपवून टाकतं याचं एक उदाहरण...



**परभणी,/प्रतिनिधी:** ऋषिकेश सकनूर हा भाजपचा कार्यकर्ता पूर्णा तालुक्यात स्थानिक पातळीवर गेली ७-८ वर्षे झाले काम करतो. त्याआधी राष्ट्रिय स्वयंसेवक संघात या कार्यकर्त्याने आयुष्याची १५ वर्षे दिली.त्यानंतरही संघाच्या प्रत्येक कामात हा माणूस हिरीरीने सहभागी असतो. परभणी जिल्हा हा शिवसेनेचा गड. बाळासाहेबांच्या काळापासून ते आतापर्यंत परभणीत असे म्हणतात की शिवसेनेचा गाढव जरी ऊभा केला तरी तो निवडून येतो. याचं ताजे उदाहरण म्हणजे परभणी महापालिकेत शिवसेना उबाठा पक्षाची सत्ता आली आहे. ना कुणी मोठा नेता परभणीत फिरकला ना उद्धव ठाकरेंनी तिथे सभा घेतली पण स्थानिक नेत्यांनी भाजपच्या विरोधात लढून सत्ता आणली. अशा परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात ऋषीकेशने संघटना बांधणीचे काम केले. गोदापट्टयात संघटन बांधण्यासाठी ज्या पक्षाला कार्यकर्ते मिळत नव्हते तिथं पक्ष मोठा केला. ऋषीकेश अहिल्यादेवींच्या नावाने अध्यासन चालवतो.त्यांच्या आयुष्यावर पुस्तके छापली जावीत यासाठी प्रयत्न करून त्यांचा ईतिहास जगासमोर आणण्यासाठी पुस्तके छापतो. पण ऐनवेळी वझूर जिल्हा परिषद गट तालुका पूर्णा मध्ये भाजपने सर्वाधिकार रासपचे आमदार रत्नाकर गुट्टेना देऊन गुट्टेंची माणसं कमळ चिन्हावर लढायला परवानगी दिली. विशेष म्हणजे आत्ताच झालेल्या नगरपालिका निवडणूकीत रत्नाकर गुट्टेनी गंगाखेड आणि परभणी जिल्ह्यात भाजपसोबत युती न करता भाजपचा पराभव करण्यासाठी विकास आघाडी बनवली.आणि भाजपचा पराभव केला. आमदार रत्नाकर गुट्टे मुस्लिम मतदार नाराज होतील म्हणून कधीच कमळ चिन्हावर निवडणूक लढत नाहीत.त्याचबरोबर त्यांना धनगर हाटकर समाजाची मते हवी असतात म्हणून यशवंत सेनेसारख्या संघटना सोबत घेऊन पिवळा झेंडा हाती घेऊन रासपकडून निवडणूक लढतात. ज्यांना भगव्याची अलर्जी आहे असा माणूस गंगाखेड मतदारसंघात कमळ चिन्हावर कोण लढणार याचे निर्णय घेतो.आणि जो कार्यकर्ता आयुष्याची २० वर्षे भाजपच्या विचारधारेसाठी भगवा खांद्यावर घेऊन लढतो त्यांना एका रात्रीत संपवतो. एक दिवस असा येईल जेव्हा भाजपची सत्ता नसेल तेव्हा भाजपकडे हेच कार्यकर्ते असतील ज्यांचे तिकीट भाजपने कुण्यातरी बाहेरच्या व्यक्तीच्या म्हणण्यावर कापलेले असते.एखाद्या पक्षाच्या सत्तेचे एक वर्तुळ असते जेव्हा ते पूर्ण होते तेव्हा दुसऱ्या पक्षाची बारी येते. कुणीही सत्तेचा अमरपट्टा घालून आलेला नसतो हे भाजपचेच नेते बोलत असतात.त्यामुळे भाजपचा जेव्हा पडता काळ सुरू होईल तेव्हा इतर पक्षातून आलेले सत्तापिपासू नेते आणि कार्यकर्ते कुठे असतील हे बघणे औत्सुक्याचे ठरेल. तूर्तास एका चांगल्या कार्यकर्त्याचा राजकिय बळी भाजपने दिलेला आहे.

● रविकुमार सुभाषराव

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**
९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रम व प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरात आंदोलनांवर तात्पुरती बंदी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जानेवारी-**

’हिंद-दी-चादर’ कार्यक्रम तसेच भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त नांदेड शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून आंदोलनात्मक कार्यक्रमांवर तात्पुरती बंदी घालण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी ’हिंद-दी-चादर’ हा कार्यक्रम होणार असून दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा राष्ट्रीय कार्यक्रम पार पडणार आहे. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या दृष्टीने सदर आदेश लागू करण्यात आला आहे.

या आदेशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, जिल्हाधिकारी कार्यालय, महात्मा गांधी पुतळा, तहसील कार्यालय नांदेड, पोलीस अधीक्षक कार्यालय, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय वैद्यकीय रुग्णालय वजिराबाद, शासकीय विश्रामगृह, अण्णाभाऊ साठे चौक, कुसुम सभागृह, रेल्वे स्टेशनकडे जाणारा रस्ता, एस.टी. ओव्हर ब्रिज, पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परीक्षेत्र कार्यालय, मोटार परिवहन विभाग, वन विभाग, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, दूध डेअरी, रेल्वे डिव्हिजन, समाज कल्याण कार्यालय आदी परिसरांतील मुख्य रस्त्यांवर दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत उपोषण, आत्मदहन, धरणे, मोर्चे, रॅली, रास्ता रोको आदी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

संबंधितांना नोटीस बजावून म्हणणे ऐकून घेण्यास पुरेसा अवधी उपलब्ध नसल्याने, आणीबाणीच्या परिस्थितीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) नुसार हा एकतर्फी आदेश निर्गमित करण्यात आला आहे. हा आदेश दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

**हिंद-दी-चादर'' कार्यक्रमानिमित्त नांदेड शहरातील आठवडी बाजार २५ जानेवारी रोजी बंद**

हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहीदी समागम राज्यस्तरीय समिती यांच्या मार्गदर्शनाखाली शीख, सिखलकरी, बंजारा-लमान, मोहियाल, सिंधी तसेच इतर सर्व समाजांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील मोदी मैदान, आसरजन येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास देशातील पंजाब तसेच इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नांदेड शहरातील मोदी मैदान, रेस्ट हाऊस परिसर, सचखंड गुरुद्वारा, गुरु गोविंद सिंगजी विमानतळ, बसस्थानक, जुना मोंढा परिसर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्केट ॲण्ड फेअर ॲक्ट, १८६२ मधील कलम ५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सदर आठवडी बाजार सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी भरविण्यात यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

**‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमानिमित्त २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड शहरात वाहतूक नियमन**

हिंद-दी-चादर या कार्यक्रमानिमित्त दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात देशातील व राज्यातील अनेक अतिमहत्वाचे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश आहे. हे सर्व मान्यवर नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास देश-विदेशातून मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल होणार असल्याने नांदेड शहरात वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील शांतता, सुव्यवस्था व वाहतुकीचे सुरळीत नियोजन राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतूक नियमनाबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे.

या कालावधीत व्हीव्हीआयपी दौऱ्यादरम्यान तात्पुरत्या स्वरूपात आसना ब्रिजशंकरराव चव्हाण चौकगुरुद्वारा मालटेकडी रोडमालटेकडी ओव्हरब्रिज, नमस्कार चौक ते नाईक चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा, हिंगोली गेट ओव्हरब्रिज, चिखलवाडी चौक, आय.टी. आय. ते अण्णाभाऊ साठे पुतळा, अण्णाभाऊ साठे पुतळा ते नाईक चौक (आनंदनगरकडे), हिंगोली गेट अंडरब्रिज ते अण्णाभाऊ साठे पुतळा, चिखलवाडी ते हिंगोली गेट ओव्हर/अंडरब्रिज, चिखलवाडी ते गुरुद्वारा हनुमान मंदिरभगतसिंग चौक, बर्की चौक ते जुना मोंढा मार्गे वजिराबाद, कविता हॉटेल ते जुना मोंढा कौठा, एम.जी. हेक्टर शोरूम ते साई कमान कौठा, भगतसिंग चौक ते श्रीराम चौक (पूर्व बाजू), अहिल्यादेवी होळकर चौकमामा चौक, बी.डी.डी.एस. ऑफिस ते मामा चौकश्रीराम चौक, लिंबगाव ते वाघी रोडहसापूर मार्ग (कार्यक्रमास येणारी वाहने वगळून), रविनगर ते नागार्जुन शाळा तसेच कौठा चौकी ते रविनगर, बसवेश्वर पुतळा ते अहिल्याबाई होळकर चौकपदमजासिटीभगतसिंग चौक हे मार्ग वाहतुकीस बंद राहणार आहेत.

वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग म्हणून चिखलवाडीअण्णाभाऊ साठे पुतळानाईक चौककडे जाणारी वाहतूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, कोर्टाच्या पाठीमागून हिंगोली गेट अंडरब्रिज मार्गे गोकुळनगरकडे वळविण्यात येईल. तसेच वजिराबाद चौकआय.टी. आपनवीन मोंढामहादेव दाल मिल मार्ग, महादेव दाल मिल रोड क्रमांक २६, शिवाजी महाराज पुतळारेल्वे स्टेशनहिंगोली गेट, बसवेश्वर चौक ते लातूर फाटा, लिंबगावभवानी चौकछत्रपती चौक मार्गे वाहतूक सुरू राहील.

नागरिकांनी दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतुकीस अडथळा होऊ नये यासाठी प्रशासनाने जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

## अखंड हरिनाम सप्ताहात आमदार भिमराव केराम यांची सदिच्छा भेट

**किनवट -** मौजे आंदबोरी (ता. किनवट, जि. नांदेड) येथे दिनांक १३ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह उत्सवात किनवटमाहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भिमराव केराम यांनी दिलेली सदिच्छा भेट दिली. याच वेळी आपले गाव हरित व स्वच्छ गाव या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून जमा केलेल्या निधीतून गावाच्या प्रमुख मार्गावर दुतर्फा ५० नारळाची झाडे व इतर १० झाडे, अशी एकूण ६० झाडे लावण्यात आली. झाडांच्या संरक्षणासाठी ग्रीन नेट बसविण्यात आले असून त्यांची निगा राखण्याची जबाबदारीही निश्चित करण्यात आली आहे. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या हरिभक्त परायण ह. भ. प. नारायण महाराज महादापूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनासाठी आमदार भिमराव केराम यांची प्रमुख उपस्थिती होती. कीर्तनातून भक्ती, एकात्मता व समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. आमदार केराम यांनी कीर्तनाचा आस्वाद घेत उपस्थित भाविकांशी संवाद साधत गावकऱ्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले. अखंड हरिनाम सप्ताहात केवळ भक्ती उपक्रमच नव्हे तर प्लास्टिकमुक्त सप्ताह, ग्रामस्वच्छता अभियान यांसारखे सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. प्लास्टिक साहित्याचा वापर टाळून गावकऱ्यांनी स्वतःची भांडी आणून भोजन केल्याने पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला गेला. ग्रामस्वच्छता अभियानात संपूर्ण गाव स्वच्छ करण्यात आले.


या सर्व उपक्रमांमध्ये गावचे सरपंच, ग्रामसेवक, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक, कर्मचारी वर्ग, भजनी मंडळ, महिला मंडळ यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नवयुवक मित्र मंडळ, आंदबोरी यांनी उत्कृष्ट नियोजन व परिश्रम घेतले. आमदार भिमराव केराम यांच्या उपस्थितीने आणि मार्गदर्शनाने अखंड हरिनाम सप्ताह भक्ती, सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संवर्धन यांचा आदर्श संगम ठरला असून परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## देगलूर शिवजन्मोत्सव समिती २०२६ जाहीर

**देगलूर**-येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, देगलूर येथे दि. २१ जानेवारी रोजी (बुधवारी) श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोउत्सव २०२६ च्या बैठकीचे आयोजन करण्यात होते. या बैठकीत सर्वानुमते नामदेव पाटील थडके देगावकर यांची श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव समिती २०२६ च्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षापदासह समितीतील विविध पदांची निवड करण्यात आली. त्यात उपाध्यक्षपदी गजानन पाटील नागराळकर व ओमकार उल्लेवार, सचिवपदी राजू देशमुख ढोसणीकर, कोषाध्यक्षपदी डॉ. सुनील जाधव तर कार्याध्यक्षपदी ड. अंकुशराजे जाधव यांची निवड करण्यात आली. तसेच स्वागताध्यक्षपदी खालेद पटेल, संघटकपदी बालाजी पाटील अंदेगाववाडीकर, सहसचिवपदी विशाल पवार, सहकोषाध्यक्षपदी संजय कांबळे, सहसंघटकपदी शेख असलम तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून राजीव ताटे यांची निवड करण्यात आली. शिवस्मारक मार्गदर्शन समितीत अध्यक्ष ड. अंकुश देसाई देगावकर, २०२५ शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष मंगल पाटील, सचिव राजू पाटील मलकापुरकर यांच्यासह नितेश पाटील भोकसखेडकर, विठ्ठलराव भोसले, व्यंकट कांबळे, संतोष पाटील येरगीकर, नितेश पाटील, चंद्रकांत मोरे, अनिल कदम, जनार्दन पाटील बिरादार, दिलीप भडके व उमाकांत भुताळे यांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर सदस्य म्हणून दत्ता पाटील केरुरे, शहाजी बाबरे, सूर्यकांत येलबुगडे, सुनील थडके, गोविंद वट्टमवार, अनिरुद्ध देशमुख व गोविंद पाटील अंदेगावे यांची निवड करून कार्यकारिणी पूर्ण करण्यात आली. या वेळी ड. अंकुश देसाई देगावकर यांचे मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित होते. यावेळी शिवस्मारक समितीचे अध्यक्ष ड. अंकुश देसाई देगावकर, शशांक पाटील, जयदीप वरखिंडे, बालाजी पाटील इब्राहिमपुरकर, गजानन पाटील मुजळगेकर, आकाश वडजे, अत्री पाटील, गोविंदराव केरुरे, पांडुरंग पाटील, पांडुरंग थडके, नवनाथ पाटील, सदाशिव शिंदे, नरेंद्र पाळेकर, दिलीप थडके, संदीप शिंदे, दिगंबर जाधव, बंटी जाधव यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

## मुदखेड येथे हभप सुनील महाराज आष्टीकर यांची भागवत कथा

**मुदखेड**-महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथाकार, भागवताचार्य परमपूज्य हभप सुनील महाराज आष्टीकर यांची मुदखेड येथे दिनांक ३१ जानेवारीपासून



श्रीमद् भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. श्री गणपती मंदिर कलशारोहण द्वितीय वर्धापनदिनानिमित्त परमपूज्य सद्गुरू नराशाम महाराज येवतीकर यांच्या कृपाआशीर्वादाने मुदखेड मोंढा भागातील सुभाष गंज येथे हभप भागवताचार्य सुनील महाराज आष्टीकर यांच्या अमृतवाणीतून दिनांक ३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान दुपारी एक ते चार या वेळात श्रीमद् भागवत कथा होणार आहे. दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हभप सुनील महाराज आष्टीकर यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.या सर्व धार्मिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुदखेड येथील समस्त गावकरी मंडळी परिश्रम घेत आहेत.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत श्री. साईबाबा निवासी अपंग विद्यालयाचे वर्चस्व

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ जानेवारी-**

जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत श्री. साईबाबा निवासी अपंग विद्यालय, हदगांव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचे नाव उज्वल केले आहे. विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पदकांवर आपले वर्चस्व सिद्ध केले.

या स्पर्धेत विद्यालयाच्या युवराज खरसकर हा १०० मिटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक तर कु. दुर्गा रॅपनवाड ५० मीटर धावणे व समर्थ पोटे लगोरी या खेळत प्रथम क्रमांक या विद्यार्थ्यांनी पटकावले. दिव्यांग असूनही जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी आपली क्षमता सिद्ध केली.



या यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. बी. पाळेकर, तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन व परिश्रम मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत योग्य प्रशिक्षण दिल्यामुळे हे यश मिळाले असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

विद्यालयाच्या या नेत्रदीपक कामगिरीबद्दल पालक, शिक्षणप्रेमी व परिसरातील नागरिकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, भविष्यातही राज्य व राष्ट्रीय स्तरावर अशीच कामगिरी घडवावी अश्या शुभेच्छा दिल्या जात आहेत अशी माहिती शाळेचे अधीक्षक भूषण नरवाडे यांनी प्रसार माध्यमाना दिली.

## अवैध मूरुम व रेतीची भोकरमध्ये सर्रास वाहतूक;महसूलचे दूर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २२ जानेवारी-**

शहरातून भरदिवसा मूरुमाची व अवैध रेतीची वाहतूक सर्रास होत असून भोकर महसूल यंत्रणा याकडे कमालीचे दूर्लक्ष करीत आहे. अवैध मूरुम व रेती वाहतूकीवर महसूल प्रशासनाकडून आळा घालण्यात यावा अशी मागणी होत आहे.

भोकर शहरात मागील काही दिवसापासून मूरुम गौनखनिजाची अवैधरित्या उत्खनन सूरु आहे भोकर महसूल विभाग मात्र याकडे साफ दूर्लक्ष करित आहे. गौणखनिजाचे उत्खनन होवू नये अवैध रेतीची वाहतूक होवू नये याकरिता महसूल विभागाकडून पथके नेमण्यात आल्याची माहिती आहे पण सदरील पथक कूठे असते हे मात्र कळत नाही नावालाच पथक नेमले कि काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. पथक कार्यरत असताना मूरुम व रेतीची वाहतूक होते कशी हा प्रश्न निर्माण झाला आहे. अवैध गौनखनिजाची वाहतूक करणारी मंडळी हि महसूल कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करुन आपला व्यवसाय सूरु केल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. अर्थिक हितसंबध असल्यानेच हा प्रकार सर्रास सूरु असल्याचे उघड दिसून येते यामूळे शासनाचा लाखोंचा महसूल बूडत आहे.महसूलच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी होत असलेल्या गौनखनिजच्या उत्खननाकडे कानाडोळा करित असल्याने मूरुम व रेती माफीयांचे मनोबल वाढले आहे.भर दिवसा हायवा ट्रॅक्टर या वाहनाद्वारे शहरातून मूरुमाची व रेतीची सर्रास वाहतूक होत असल्याचे दिसून येते भोकरचे महसूल अधिकारी याकडे जाणून बूजून दूर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास येते. महसूल विभागाने सर्व सामान्य नागरीकांची कामे प्रलंबित ठेवत जो दाम देईल त्यांची कामे करण्याचा सपाटा सूरु ठेवल्याचे पहावयास मिळत आहे.वरिष्ठांनी भोकर शहरात सूरु असलेल्या अवैध मूरुम व रेती वाहतूकीकडे लक्ष घालून होत असलेल्या वाहतूकीवर आळा घालावा व अवैध मूरुम रेती वाहतूक करित असलेल्या वाहनावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही : आ. बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड,दि. २२ जानेवारी-**

सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड पुनर्वसन योजनेअंतर्गत भायेगाव व किकी या दोन्ही गावातील अंतर्गत सीसी रस्ते व नाली बांधकाम या कामाचा भूमिपूजन सोहळा दिनांक २२ जानेवारी रोजी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी बोलताना बोंढारकर म्हणाले की भायेगाव व किकी ही गावे मी दत्तक घेतल्यासारखे आहेत या गावांना मी विकास कामासाठी निधी कधीच कमी पडू देणार नाही असे मत आमदार बोंढारकर यांनी व्यक्त केले.

नांदेड तालुक्यातील व शहरानजीक असलेल्या भायेगाव येथील विकास कामाच्या भूमिपूजन सोहळा दिनांक २२ जानेवारी रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड पुनर्वसन अंतर्गत सीसी रस्ते व नाली बांधकामासाठी ८४ लाख एवढा निधी

दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी दिला. व येथील कामाचे भूमिपूजन सोहळा ग्रामस्थांच्या उपस्थित पार पडला.

यावेळी बोलताना आमदार बोंढारकर म्हणाले की हे गाव मी दत्तक घेतल्यासारखे आहे म्हणून येथे विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. यावेळी ग्रामपंचायत सरपंच सविता खोसडे, उद्धव पाटील शिंदे, सुहास खराणे, शिवाजी कदम, सुदीन बागल, गंगाधर खोसडे,उत्तम खोसडे, विठ्ठल खोसडे ,संभाजी खोसडे ,पांडुरंग कोचार, मारोती खोसडे, प्रभू पाटील कोल्हे, शिवानंद पाटील खोसडे, राजु खोसडे,गौतम भालेराव,बाबुराव कोल्हे, शंकर कोल्हे, माधव कोल्हे, दत्ता पाटील शिंदे, नारायण देशमुख, रामराव निळकंठ, उमाताई खोसडे यांच्यासह गावकऱ्यांची मोठी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी पाटील भायेगावकर यांनी केले. तसेच यावेळी किकी गावातही सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड पुनर्वसन योजनेअंतर्गत १ कोटी ८ लाख रुपये एवढा निधी आमदार बोंढारकर यांनी दिला. यावेळी या सोहळ्याचे अध्यक्ष बाबुराव देशमुख , ग्रामपंचायतचे सरपंच रवी देशमुख, व्यंकट देशमुख, अर्जुन देशमुख, शिवाजी तेलंगे, आदी उपस्थित होते.

## कृऊबा समितीमधील अवैध गाळे बांधकाम पणन संचालकांनी दिले कारवाईचे निर्देश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जानेवारी-**

कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड मध्ये असलेल्या व्यापारी गाळयांचे लिलावाव्दारे वाटपास कलम १२ (१) चे उल्लंघण करणे, ना.वा.श.म.न.पा. ने दिलेल्या बांधकाम परवान्याचे उल्लंघन करुन नकाशा रहीत बांधकाम, प्रति नं. १ यांनी दिलेल्या मंजुरीपत्र जा.क्र. ६२२१/२०२४ दि.१३/९/२०२४ चे पालन न करणे, बांधकामाच्या निविदेत / टेंडर मंजुरीचे दि. २५ सप्टेंबर २०२४ चे पत्राचे उल्लंघन करणे, कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड मुख्य व उपबाजारातील भुखंड भाडेपट्याने न देता अप्रत्यक्षपणे विक्री करणे, गाळे लिलावासंदर्भात प्रसिद्ध दैनीकात जाहीर प्रगटन न देणे, नियम व अटीचे पालन न करता गाळे विक्री करणे, नवीन व्यापारी गाळे बांधणे, परवानगी तळमजल्याची असतांना पहिला मजला बांधणे कृषी उत्पन्न बाजार समितीने घेतलेल्या ठरावाची प्रती न देणे अशा अनेक नियमांना तिलांजली देऊन कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडच्या मोकळया भूखंडाचे लचके तोडणाऱ्यावर कायदेशीाी कारवाई करावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा ॲड. प्रमोद नरवाडे यांनी दिला होता. या निवेदनाची दखल घेत राज्याचे पणन संचालक मोहन निंबाळकर यांनी या संदर्भाने कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा उपनिबंधकांना दिले आहेत.

या संदर्भाने तक्रार केजल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने जि माहिती दिली ती संश्यास्पद व अपूर्ण उत्तरे देण्यात आली असल्याचे अूड. प्रमोद नरवाडे यांनी निवेदात नमुद केले आहे.

एस.बी.आय. बैंक नवा मोंढा, च्या पुर्वेस तळमजला आणि पहिला मजला असे बांधकाम करण्यात आले आहे. त्यासंबंधी ज्या दैनिकामध्ये जाहीर प्रगटन टाकण्यात आले होते त्या संबंधीची माहिती अपूर्ण आहे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका नांदेड चा बांधकाम परवाना क्र.५२८ दि. १५/०३/२०१२ ची अंतरिम मंजुरी प्रमाणपत्र देण्यात आले असुन त्याला १३ वर्ष पुर्ण झाले आहेत त्यासाठी फक्त १ वर्षाची मुदत असते ती १५/४/२०१३ ला संपललेली आहे. मंजुरी पेक्षा जास्त प्रमाणात व्यापारी गाळण्यात बांधण्यात आले आहेत.

त्यातच बांधकाम परवान्याविषयी कोणताही सबळ पुरावा त्यांच्या उत्तरात दिलेला नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडचे व्यापारी गाळे बांधकाम संदर्भात निधीचा पुरवठा आणि त्या खर्चाबाबत जे पुरावे दिले आहेत ते दि. ०१/०८/२०२४ चे आहेत. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांच्या मंजुरी आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेने दिलेलया बांधकाम परवान्याच्या कालावधीमध्ये फरक स्पष्ट दिसत आहे.

त्यामुळे हे बांधकाम शेतकऱ्याच्या विकासासाठी आणि सोई सुविधेसाठी गाळयाचे बांधकाम केले नसुन सर्व संचालकांनी स्वतःच्या स्वार्थसाठी आणि आर्थिक लाभमिळवण्यासाठी व्यापारी गाळयाचे बांधकाम केले असुन कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडच्या मोकळया भुखंडामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या तळमजला आणि पहिला मजला यासंपुर्ण गाळयांची आपण सविस्तर चौकशी करावी आणि संबंधीत संचालक व सचिव यांच्याविरोधात कायदेशीर कार्यवाही करावी अन्यथा शेतकऱ्यांच्या हितासाठी सनदशिर मार्गाने आंदोलन उपोषण करण्यात येईल याउपरही न्याय न मिळाल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्याचा ईशारा ॲड. प्रमोद नरवाडे यांनी निवेदनाद्वारे दिला होता या निवेदनाची दखल घेत राज्याचे पणन संचालक मोहन निंबाळकर यांनी बाजार समितीचे नियंत्रक अधिकारी असलेने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७, बाजार समिती सेवानियम, उपविधी. याबाबतचे शासननिर्णय व परीपत्रकान्वये आवश्यक ती कार्यवाही करावी व संबधितांना परस्पर तसे कळविण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.

## बळीराजा शेत पानंद रस्ते विशेष अभियानाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २२ जानेवारी-**

किनवटमाहूर विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या बळीराजा शेत पानंद रस्ते विशेष अभियानाचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या विशेष अभियानाचे उद्घाटन आ.भिमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आले.

या अभियानाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाण्यासाठी पक्क्या व सर्वहंगामी रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. याअंतर्गत पानंद रस्त्यांचे सर्वेक्षण, नकाशांकन व पुनर्स्थापना करण्यात येणार असून, अतिक्रमणमुक्त शेत रस्त्यांसाठी स्वतंत्र विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

या अभियानामुळे शेतमाल वाहतुकीसाठी लागणारा वेळ व खर्चात लक्षणीय बचत होणार आहे. पावसाळ्यातही शेतात जाण्यास अडथळे येऊ नयेत, यासाठी सर्व ऋतूंमध्ये वापरता येतील असे रस्ते विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच ग्रामस्तरावर शेत रस्त्यांचा समन्वयित व नियोजनबद्ध विकास साधण्यात येणार आहे.

कृषी यंत्रसामग्रीचा वापर सुलभ होऊन आधुनिक शेतीला चालना मिळेल. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी मजबूत पायाभूत सुविधा निर्माण होणार असून, गावाच्या सर्वांगीण विकासात शेत रस्त्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

या कार्यक्रमप्रसंगी बोलताना आमदार भिमरावजी केराम यांनी सांगितले की, शेतकरी आणि प्रशासन यांच्या परस्पर समन्वयातून या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केली जाईल. शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करून त्यांचे जीवनमान उंचावणे हेच या अभियानाचे अंतिम ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उद्घाटनप्रसंगी आमदार भिमराव केराम यांचे स्वीय सहाय्यक प्रकाश कुडमते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेष अभियानामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी दूर होऊन ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

**भोकर नगरपरिषद, भोकर जि. नांदेड**
मुख्य प्रशासकीय इमारत
साईबाबा पेट्रोलपंप समोर, नांदेड रोड, भोकर ता. भोकर जि. नांदेड-४३१८०१

Email: - cobhokargmail.com
दुरध्वनी क्रमांक कार्यालय (०२४६७) २२२२९९-२२३३९९

जा.क्र. ३८९
दिनांक : २२ जानेवारी २०२५

**ई-निविदा सूचना**
**(स्वच्छता विभाग)**
**(२०२५-२६)**

मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि.नांदेड यांच्या वतीने भोकर नगरपरिषद अंतर्गत भोकर शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प नगर परिषद भोकर येथे जुन्या माचलेल्या कचन्याचे शास्त्रोक्तरित्या (बायोमायनींग प्रक्रियेव्दारे) विल्हेवाट लावणे या कामाकरिता ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. दि. २३/०१/२०२६ ते ३०/०१/२०२६ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

दिनांक २२/०१/२०२६

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद भोकर**
**जि. नांदेड**

# उपप्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने शहरातून भव्य हेल्मेट रॅली

## पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी दाखवली हिरवी झेंडी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**

वाढते रस्ते अपघात रोखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी गुरूवार दि २२ जानेवारी रोजी शहरात भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि शहर वाहतूक शाखा यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित या रॅलीचा प्रारंभ स्थानिक संत नामदेव पोलीस कवायत मैदान येथून करण्यात आला.

पोलीस अधीक्षक नीलभ रोहन आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांच्याहस्ते रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रस्ते सुरक्षा मोहिमेचा मुख्य कार्यक्रम पार पडला. त्यानंतर हिंगोलीचे पोलीस अधीक्षक नीलभ रोहन यांनी रॅलीस हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, वाहतुक शाखेचे पोनि शरद मरे यांच्यासह पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरक्षित प्रवास, सुखी प्रवास हा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

शहरातील मुख्य मार्गावरून जनजागृती पोलीस कवायत मैदानावरून निघालेली ही रॅली शहरातील विविध भागांतून मार्गस्थ झाली. यामध्ये सहभागी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी आणि आरटीओ विभागाच्या प्रतिनिधींनी हेल्मेट परिधान करून सुरक्षेचा संदेश दिला. रॅली दरम्यान

दुचाकी चालवताना हेल्मेटचा अनिवार्य वापर करावा,

वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळणे, वाहतुकीचे नियम आणि संकेतांचे पालन करणे, ओव्हरस्पीड आणि मद्यपान करून वाहन चालवण्यापासून परावृत्त करणे, लोकसहभागाचे आवाहन शहरातील मुख्य चौकांमध्ये रॅलीचे आगमन झाले असता, नागरिकांचे लक्ष वेधले गेले. केवळ दंडात्मक कारवाई हा उद्देश नसून नागरिकांनी स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेसाठी नियमांचे पालन करावे, असे आवाहन यावेळी शहर वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले.

रस्ते सुरक्षा हा केवळ प्रशासनाचा विषय नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. हेल्मेट आणि वाहतुकीचे नियम पाळल्यास अनेक निष्पाप जीव वाचू शकतात. या रॅलीच्या माध्यमातून हिंगोलीकरांनी सुरक्षेचा संकल्प करावा असे आवाहन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी यावेळी केले.

# हिंगोलीत अखील भारतीय विद्यार्थी परिषदेचे अधिवेशन

## राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद देवगिरी प्रदेशाचे ६० वे हीरक महोत्सवी अधिवेशन संपन्न होणार असून या अधिवेशनाचे उद्घाटन सार्वजनिक बांधकाम व आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचेहस्ते होणार आहे.

हिंगोली शहरात प्रथमच छात्रशक्तीचे अधिवेशन होणार असून या अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्याला अभाविपच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा प्रा डॉ सुरभी दवे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तसेच मराठवाडा आणि खानदेशातून ३५० विद्यार्थी, विद्यार्थींनी व प्राध्यापकांची उपस्थिती असणार आहे.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला भारतरत्न स्व नानाजी देशमुख यांच्या नावाने प्रदर्शनी कक्षाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची उपस्थिती असणार आहे. भारतीय ज्ञान परंपरा दिशा दर्शन या विषयाची मांडणी आचार्य श्रेयश कुऱ्हेकर, विकसित भारत २०४७ विषयाची मांडणी अभाविप क्षेत्रीय संघटन मंत्री चेतस सुखडिया, अभाविप काल, आज आणि उद्या विषयाची मांडणी क्षेत्रीय संघटनमंत्री गीतेश चव्हाण करणार आहेत.

विद्यार्थी परिषदेने देवगिरी प्रदेशात महाविद्यालय अनुपस्थिती विषयाला घेवून सर्वेक्षण केले होते. या विषयावर परिसंवाद अधिवेशनामध्ये आयोजित केला आहे. या परिसंवादास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ विजय माहेश्वरी, सुप्रसिध्द उद्योजक मंगेश निटूरकर, अभाविपचे राष्ट्रीय कार्यकारणी विशेष निमंत्रित सदस्य प्रा हंसराज जोशी व विद्यार्थी प्रतिनिधी कु वैभवी ढिवरे यांची उपस्थिती असणार आहे. दि २४ जानेवारी रोजी दुपारी शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेचा समारोप छात्र नेत्यांच्या जाहीर सभेने होणार आहे. या जाहीर सभेस अभाविपचे राष्ट्रीय मंत्री पायल किनाके व प्रदेश मंत्री डॉ वरूणराज नन्नवरे यांची उपस्थिती असणार आहे.

अधिवेशानात शैक्षणिक सद्यस्थिती, सामाजिक सद्यस्थिती व महाविद्यालयीन विद्यार्थी अनुपस्थिती या तीन विषयांना घेवून प्रस्ताव सभागृहासमोर ठेवले जाणार आहेत. अधिवेशाचा समारोप प्रदेश संघटनमंत्री सिध्देश्वर लटपटे करणार आहेत. अधिवेशातून दिशा घेवून कार्यकर्ते पुढील वर्षभर आपल्या कामाला गती देण्याचे काम करणार आहेत अशी माहीती देवगिरी प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे यांनी दिली.

# शनिवारी हिंगोलीत सत्रहवाँ श्रृंगार काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा हिंगोलीच्या वतीने सौ. सुमन गोपाल दुबे 'स्वामिनी' लिखित बहुप्रतिक्षित हिंदी काव्यसंग्रह 'सत्रहवाँ श्रृंगार' याचा प्रकाशन सोहळा तसेच 'थवा प्रकाशन, हिंगोली' या नव्या प्रकाशन संस्थेच्या बोधचिन्हाचे अनावरण शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम शिवाजीराव देशमुख सभागृह, रामलीला मैदान, हिंगोली येथे दुपारी ०४.०० ते ०७.०० या वेळेत पार पडणार असून यानिमित्ताने निमंत्रितांचे भव्य कवी संमेलनही आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कादंबरीकार अशोक अर्धापुरकर हे असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ. रेखाताई श्रीराम बांगर, सुप्रसिद्ध चित्रकार व ज्येष्ठ कवी भ. मा. परसवाळे, छत्तीसगड येथील प्रसिद्ध गीतकार राकेश तिवारी, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव पवार, ज्येष्ठ कवी प्रा. विलास वैद्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी, प्रधानमंत्री राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धाचे हेमचंद्र वैद्य तसेच ज्येष्ठ कवी व व्याख्याते डॉ. केशव खटिंग हे उपस्थित राहणार आहेत.

दुसऱ्या सत्रात निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले असून त्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी प्रा. राजाराम बनस्कर हे असतील. या कवी संमेलनात राज्यासह परराज्यातील नामवंत कवी सहभागी होणार आहेत. डॉ. सीमा अवस्थी (छत्तीसगड), रोहिणी पांडे (नांदेड), संध्या फुलपगार (छ. संभाजीनगर), डॉ. संजय नाकाडे, रतन आडे, गोडाती काळे, गणेश येवले, डॉ. राधिका देशमुख, कलानंद जाधव, अनिकेत देशमुख, पारिजात देशमुख तसेच हनुमंत सोनवणे (छ. संभाजीनगर) यांचा समावेश आहे.

या साहित्यिक उपक्रमासाठी मराठवाडा साहित्य परिषद शाखा हिंगोलीचे कार्यवाह दिलीप धामणे, थवा प्रकाशनचे सर्व संचालक तसेच गोपाल दुबे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. कार्यक्रमासंदर्भातील अधिक माहितीसाठी गोडाती काळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे. तसेच या साहित्यिक मेजवानीचा लाभ हिंगोली शहर व परिसरातील साहित्यप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन माजी नगरसेवक व समाजसेवक गोपाल दुबे यांनी केले आहे.



**हिंगोली– सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी श्रीमती सुनीता मुळे तसेच रजनी पाटील यांची निवड करण्यात आली. यावेळी त्यांचा सत्कार करतांना जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकारी, खंडेराव सरनाईक, कल्याण देशमुख, पप्पू चव्हाण, ॲड अमोल जाधव, डॉ नामदेव कोरडे, ॲड उल्हास पाटील, पत्रकार शाम सोळंके, ढाकरे, त्र्यंबकराव लोंढे, हेंबाडे आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### ध्वजारोहनासंदर्भात नागरिकांना आवाहन

हिंगोली– प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर दि २६ जानेवारी रोजी मुख्य ध्वजारोहनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यामुळे सध्याची परिस्थिती पाहता ध्वजारोहन समारंभास उपस्थित राहणाऱ्या सर्व सुजाण, नागरिकांनी सोबत काही सामान, पिशवी, बॅग, पर्स, इलेक्ट्रानिक यंत्र आदी सारखे साहित्य सोबत घेवून येऊ नये तसेच काही संशयीत वस्तू, इसम, बेवारस वाहन निदर्शनास आल्यास त्वरीत पोलिस नियंत्रण कक्ष ०२४५६-२२०२४२, ८६६९९००६७६ बॉम्ब शोधन व नाशक पथक किंवा संबंधीत जवळचे पोलिस ठाण्याला माहीती कळवावी, तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, याबाबत दक्षता घ्यावी आणि पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन पोलिस विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

### अश्लीलतेवर बंदी आणण्याची मागणी

हिंगोली– येथील संस्कृती रक्षक दलाच्यावतीने प्रसार माध्यमांवर येणाऱ्या अश्लील व्हिडीओ, छायाचित्र यांच्यावर बंदी घालण्याची मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात मोबाईल, टीव्ही, युट्युब, इन्स्टाग्राम, फेसबुक, एआय आदी माध्यमांवर अश्लीलता दिवसेंदिवस वाढत असून तरूण पिढीवर त्याचा दुष्परिणाम होत आहे. भावी पिढी संस्कारहीन आणि कमजोर होत आहे. त्यांच्यामध्ये कामवृत्ती वाढत असून गंभीर अपराधाकडे भावी पिढी जात आहे. तसेच लैंगिक शिक्षण पाठ्यपुस्कांमधून काढून टाकण्यात यावे. यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी संस्कृती रक्षक दलाचे प्रकाशचंद सोनी यांनी केली आहे.

### मूर्तीजापूर सावंगीत क्रिडा महोत्सव



हिंगोली–औंढा नागनाथ तालुक्यातील सिद्धेश्वर केंद्रात केंद्रस्तरीय क्रीडा महोत्सव २०२५- २६ घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी दोन दिवसीय सिद्धेश्वर केंद्रात केंद्रस्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. क्रीडा महोत्सव हा दोन दिवस घेण्यात आला. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के व शिक्षणाधिकारी प्राथमिक जि प हिंगोली आसावरी काळे यांच्या हस्ते झाले. सिद्धेश्वर केंद्रातील केंद्रस्तरीय क्रीडा महोत्सवास गटशिक्षणाधिकारी रवी कवडे, शिक्षण विस्तार अधिकारी संजय मेथेकर, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ केशव सारंग, केंद्रप्रमुख मोहन पोले, केंद्रीय मुख्याध्यापक रवींद्र आडे, क्रीडा महोत्सवाचे अध्यक्ष बजरंग देवकर, सचिव संतोष आघाव, मुख्याध्यापक बाळू चव्हाण, मूर्तिजापूर सावंगी सरपंच विशाल मस्के, उपसरपंच भिवाजी कोकाटे उपस्थित होते.

# जनावरे चोरणाऱ्या तिघांना कुरूंदा पोलिसांनी केली अटक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**

वसमत तालुक्यातील कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत एका शेतातील आखाड्यावरून दोन म्हशी व एक वघार चोरीची घटना घडली होती. याप्रकरणी कुरूंदा पोलिसांनी तिघांना अटक केली असून त्यांच्याकडून ५ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कुरूंदा येथील नितीन भीमराव इंगळे यांच्या शेतातील आखाड्यावरून दोन म्हशी व एक वघार अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली होती. या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांनी सपोनि रामदास निरदोडे यांच्याकडे सोपविला. कुरूंदा पोलिसांनी वेगवेगळे पथक स्थापन मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरखेड येथील बाजारात विक्रीसाठी गेलेल्या दोन म्हशी व एक वघार तसेच चोरीसाठी वापरलेले वाहन असा ५ ला, ७५ हजारांचा मुद्देमाल आरोपीकडून जप्त केला आहे. याप्रकरणी नागेश सुभाष दळवी रा कुरूंदा, पवन शंकर बळवंत रा दांडेगाव, अर्जून साहेबराव नरवाडे रा कोठारी यांना अटक करण्यात आली आहे. सदरील कामगिरी सपोनि रामदास निरदोडे, उपनि गंधकवाड, वडकिल्ले, नरडिले, भालेराव यांनी केली आहे.

# तोंडापूर शिवारात झन्ना-मन्ना जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**

कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर शिवारात यात्रेच्या परिसरात झन्ना-मन्ना नावाचा जुगार खेळणाऱ्या अड्ड्यावर आखाडा बाळापूर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून रोख रकमेसह पाच मोबाईल जप्त केले. या प्रकरणी आठ जणांवर आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात बुधवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर येथे यात्रा महोत्सव सुरू आहे. या यात्रा महोत्सवाच्या परिसरातच काहीजण जुगार खेळत असल्याची माहीती आखाडा बाळापूर पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, उपनिरीक्षक गणेश घोटके, जमादार राजेश घोंगडे, शिवाजी पवार, जी एच शेख यांच्यासह पोलिस पथकाने माहीती घेवून खात्री केली.

त्यानंतर पोलिसांनी साध्या वेशात जाऊन त्याठिकाणी छापा टाकला. यामध्ये आठजण जुगार खेळत असतांना आढळून आले. मात्र पोलिस आल्याचे लक्षात येताच त्यापैकी तिघेजण फरार झाले. पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून पाच मोबाईल, जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा सुमारे ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे यांचय तक्रारीवरून प्रल्हाद भाले, बाळूअप्पा पत्रे रा तोंडापूर, नागेश पतंगे रा कुर्तडी, रामजी नादरे, गजानन कऱ्हाळे, ईश्वर राजगिरे रा गिरगाव, श्रीराम मोळके, राजू जगताप रा लिंबगाव ता अर्धापूर यांच्याविरूध्द आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमादार जी एच शेख पुढील तपास करीत आहेत.

# श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त श्री विघ्नहर्ता चिंतामणी मंदिरात होम-हवन, भाविकांची गर्दी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**

शहरातील गड्डीपीर गल्ली भागात असलेल्या प्रसिद्ध श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरात आज गणेश जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. 'नवसाला पावणारा गणपती' अशी ख्याती असलेल्या या मंदिरात आज पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या.

गणेश जन्मोत्सवाचे औचित्य साधून मंदिर समितीच्या वतीने विशेष होम-हवन आणि पूजेचे आयोजन करण्यात आले होते. मंत्रोच्चारांच्या घोषात आणि धुपाच्या सुगंधात संपूर्ण मंदिर परिसर भक्तीमय झाला होता. लोककल्याण आणि शांततेसाठी करण्यात आलेल्या या हवनामध्ये अनेक दांपत्यांनी सहभाग नोंदवला. गड्डी पीर गल्लीतील या विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीवर भाविकांची अलोट श्रद्धा आहे. हा गणपती नवसाला पावणारा असल्याची श्रद्धा असल्याने, केवळ हिंगोली शहर किंवा जिल्हाच नव्हे, तर राज्यभरातून भाविक आज दर्शनासाठी हिंगोलीत दाखल झाले होते. भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे मंदिर प्रशासनाकडून दर्शन व्यवस्था अतिशय सुव्यवस्थित करण्यात आली होती.

# दरेगाव येथे यात्रेनिमित्त भव्य कुस्त्यांची दंगल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**

औंढा नागनाथ तालुक्यातील दरेगाव येथील माता जगदंबा देवी यात्रा उत्सवानिमित्त दिनांक २१ जानेवारी बुधवार रोजी दुपारी दोन वाजता भव्य कुस्त्यांच्या दंगली सुरुवात झाली.

कुस्त्यांच्या दंगलीचे उद्घाटन लक्ष्मीकांत नवघरे यांच्या हस्ते झाले. यामध्ये पहिलवान स्वप्नील सावळे निशाणेकर यांनी पहिल्या क्रमांकाची कुस्ती चितपट करून प्रथम बक्षीस मिळवले. विजेत्या मुलांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. १९ जानेवारी रोजी महारुद्र हनुमान, संत सेवालाल महाराज, संत मुंगसाजी महाराज यांचा ज्येष्ठ नेते लखूसिंग राठोड, विजय राठोड सह मान्यवरांच्या हस्ते पूजा अभिषेक करून यात्रेला सुरुवात करण्यात आली. राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष आदित्य आहेर, युवा तालुकाध्यक्ष गोपाळ मगर आदींची उपस्थिती होती.





बीड शहरातील सहयोग नगरमधील श्री सर्वेश्वर गणेश मंदिर तसेच लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात गणेश जयंती साजरी

बीड शहरातील सहयोगनगर भागातील श्री सर्वेश्वर गणेश मंदिरात गणेश जयंती उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी ८ वाजता ब्रह्मवृंदातर्फे अथर्वशीर्षचे पठण करण्यात आले.गणेशाची आरती करण्यात आली व प्रसादाचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी शहरातील विविध भागातील भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.तसेच बीड तालुक्यातीलबालाघाटावरील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व लाभलेल्या लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानच्या वतीने गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.(छाया–श्रीकांत कुलकर्णी)

# गेवराईत संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने भव्य सत्संग सोहळ्याची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२२ जानेवारी**

येथील संस्कृती प्रतिष्ठान च्या वतिने विश्व माउली ज्ञानेश्वर माऊली सप्तशतकोत्तर अमृत महोत्सव व संत श्री भगवानबाबा व संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यास्मरणार्थ प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी गुरूवार दि.२९ जानेवारी पासुन गजानन महाराज मंदिर गेवराई या ठिकाणी भव्य सत्संग किर्तन सोहळा महोत्सवास प्रारंभ होत असुन या सोहळ्यात महाराष्ट्रातील ख्यातनाम नामवंत किर्तनकारांची किर्तन सेवेसाठी उपस्थिती लाभणार आहे. या किर्तन महोत्सवाचे हे १९ वे वर्ष आहे. सध्या या सत्संग किर्तन सोहळ्याची जोरदार तयारी चालु असुन प्रतिष्ठानच्या वतीने सर्व पदाधिकारी आपले मोलाचे योगदान देत आहेत. तरी गेवराईकरांनी या सत्संग किर्तन सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सोहळ्याचे अध्यक्ष उद्धव बापू मडके सह संस्कृती प्रतिष्ठानच्या वतिने करण्यात आले आहे.

गेवराई येथे संस्कृती प्रतिष्ठान च्या वतीने गजानन महाराज मंदिर या ठिकाणी गेल्या १९ वर्षापासून भव्य दिव्य अश्या सत्संग किर्तन सोहळ्याचे दरवर्षी नियोजनबध्द अयोजन केले जात आहे. यामध्ये शहरातील तसेच तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. तर या वर्षीच्या सत्संग किर्तन सोहळ्यास दि.२९ जानेवारी रोजी सकाळी १० वा. प्रतिमापूजन ह.भ.प.रामेश्वर महाराज राऊत, मनोहरभाऊ पिसाळ, शिवनाथ मस्के यांच्या हस्ते व कलश पुजन शैलेश तोष्णिवाल, संदिप मडके, संजय भालशंकर यांच्या हस्ते होणार आहे. तसेच सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणुन आमदार धनंजय मुंडे, आमदार विजयसिंह पंडित, माजी आमदार बदामराव पंडित, बाळराजे पवार, ॲड. महादेव तुपे, दिलीप गोरे, जगन्नाथ काळे, महेश आण्णा दाभाडे, जगन पाटील काळे, शिवप्रसाद खेडकर, राहुल खंडागळे, दिपक आतकरे, प्रा.बी.टी.चव्हाण, शेख खाजाभाई, शेख मन्सुरभाई, बिपीन डरफे, ज्ञानेश्वर नवले, जालींदर पिसाळ, बाळासाहेब बरगे, विनोद नरसाळे, अंकुश आतकरे, अमोल कापसे, अय्युब बागवान, सुभाष सुतार, विनोद पौळ, अमोल वैद्य, गणेश क्षीरसागर, सुशिल टकले, जुनेद बागवान, अनिल राठोड, बापुसाहेब हुंबरे, संतोष सुतार, सुनिल पोपळे अदिंच्या उपस्थिती मध्ये सत्संग किर्तन सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. तर सत्संग किर्तन सोहळ्यातील दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत. गुरुवार दि.२९ रोजी वेद मुळे, ऋषी पवार यांचा संतवाणी एक सुरेल प्रवास कार्यक्रम सायं ८ वा. ह.भ.प. पांडुरंग महाराज गिरीसद्गुरू रामगिरी म. संस्थान वावी, नाशिक यांचे सुश्राव्य किर्तन, तर शुक्रवार दि. ३० रोजी सायंकाळी ६ वा. संगित अलंकार उद्धव शिंदे (आळंदी) यांचे देवाचीया द्वारी संगित भजनाचा कार्यक्रम सायं ८ वा. ह.भ.प ज्ञानेश्वर धायगुडे शास्त्री ज्ञानेश्वरी विद्यापीठ, श्रीक्षेत्र भगवानगड यांचे सुश्राव्य किर्तन होईल.

# सायगावमध्ये थरार! विनापरवाना पिस्तूलमधून गोळीबार करणाऱ्या तरुणाला बर्दापूर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**दोन अग्नीशस्त्रे, जिवंत काडतुसे आणि मोटारसायकलसह १ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ जानेवारी**

अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथे विनापरवाना बेकायदेशीररीत्या अग्नीशस्त्रे बाळगून गोळीबार करणाऱ्या एका ३५ वर्षीय तरुणाला बर्दापूर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि एक मोटारसायकल असा एकूण १ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे सायगाव येथे २१ जानेवारी रोजी पहाटे दोनच्या सुमारास आरोपी सय्यद अहमदअली मुब्बशीरअली हाशमी (वय ३५) याने स्वतःच्या ताब्यात बेकायदेशीररीत्या अग्नीशस्त्रे ठेवून, लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने गोळीबार केला. या घटनेची माहिती मिळताच बर्दापूर पोलिसांनी तातडीने हालचाली करून आरोपीला ताब्यात घेतले.

पोलीस हवालदार गणेश विक्रम तांदळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. झडती दरम्यान आरोपीकडे एक 'Made in US-' बनावटीची ९ एमएम पिस्टल, एक 'Made in Japan' बनावटीची सिल्वर रंगाची





रिवॉल्वर, तीन जिवंत काडतुसे, गुन्ह्यात वापरलेली टीव्हीएस स्टार सिटी मोटारसायकल (क्र. MH 23 R 0317) मिळून आली आहे. बर्दापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि कांबळे आणि पोलीस उपनिरीक्षक घुले यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला. आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियम (Arms -ct) आणि भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ११० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सध्या गावात शांतता असून, आरोपीकडे ही शस्त्रे कोठून आली याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक घुले करत आहेत.

# शेत रस्त्यांवर राजकारण नको;सामोपचाराने प्रश्न सोडवा-बाळराजे पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२२ जानेवारी**

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील शेत रस्ते, शिव रस्ते तसेच गावांतर्गत रस्त्यांचे प्रश्न प्रशासनाने नियमानुसार आणि शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून तातडीने निकाली काढावेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांमध्ये कोणतेही राजकारण करू नये. गावच्या रस्त्यासाठी सर्व राजकीय मतभेद बाजूला ठेवून सामोपचाराने तोडगा काढणे आवश्यक आहे, असे ठाम मत भाजपाचे नेते बाळराजे पवार यांनी व्यक्त केले.



तालुक्यातील काही गावांमध्ये शेत रस्ते व गाव रस्त्यांवरून वादविवाद सुरू असून, त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण होत आहे. या पार्श्वभूमीवर आज गुरुवार दि. २२ रोजी सकाळी अकरा वाजता भाजप नेते बाळराजे पवार यांनी गेवराई तहसील कार्यालयात तहसीलदार संदीप खोमणे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी संबंधित गावकऱ्यांची भूमिका स्पष्टपणे मांडत रस्त्यांबाबतचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी मागणी केली.यावेळी शासकीय स्वस्त धान्य दुकानासंदर्भातील प्रश्नही उपस्थित करण्यात आला. गावकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन संबंधित राशन दुकान जोडण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली असून, त्यानुसार निर्णय होणे अपेक्षित असल्याचे बाळराजे पवार यांनी सांगितले. प्रशासन व गावकरी यांच्यातील संवादाचा अभाव असल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत असून, हा संवाद अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

किचकट व संवेदनशील विषय ऐरणीवर येत असतील, तर त्यामध्ये राजकारण करण्याची आवश्यकता नाही. अशा प्रश्नांवर बैठक घेऊन सामंजस्याने निर्णय घ्यावेत, जेणेकरून गावातील सलोखा अबाधित राहील, असे आवाहनही त्यांनी केले.तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या या आढावा बैठकीत शेत रस्ते, गाव रस्ते, शिव रस्ते तसेच राशन दुकानांशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बाळराजे पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देत, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी प्राधान्याने सोडवाव्यात, असे निर्देश दिले.

# रणबीर कपूर बनला 'पीएनजी ज्वेलर्स'चा ब्रॅण्ड ॲम्बेसेडर

**पीएनजी ला मिळणार आता जगभर ओळख**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जानेवारी**

१८३२ पासूनचा समृद्ध वारसा जपणारा भारतातील एक अग्रगण्य दागिन्यांचा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'ने बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर याची नवा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. परंपरेची जाण, आकर्षकता आणि विश्वासार्हता यांचा सहज संगम असलेला रणबीर कपूर 'पीएनजी ज्वेलर्स'च्या प्रवासातील एक रोमांचक नवा अध्याय ठरणार असून, यामुळे ब्रँडची राष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती अधिक भक्कम करणार आहे.

पीएनजी ज्वेलर्स हा पिढ्यान्पिढ्यांचा वारसा जपणारा आणि विश्वास व मूल्यांवर उभा असलेला ब्रँड आहे, ज्याचा मी मनापासून आदर करतो. परंपरेचा सन्मान करत भविष्याकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणाऱ्या या ब्रँडचा भाग होणे माझ्यासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे आणि या प्रवासाचा मी अभिमानाने भाग बनत आहे.या भागीदारीबद्दल आपला आनंद व्यक्त करताना 'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, रणबीर कपूर यांचे व्यक्तिमत्त्व परंपरेचा आदर राखत आधुनिकतेकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणारे आहे. जसा पीएनजी ज्वेलर्सने आपल्या मुळांशी निष्ठा राखत काळानुसार स्वतःला विकसित केले आहे, तसेच रणबीर कपूरने एका आयकॉनिक वारशाला प्रामाणिकपणे आणि सुसंगततेने पुढे नेले आहे. ही भागीदारी केवळ दृश्यमानतेपुरती मर्यादित नसून, समान मूल्ये आणि भविष्याकडे पाहणाऱ्या सामायिक दृष्टीकोनावर आधारित आहे.या सहकार्याद्वारे पीएनजी ज्वेलर्स आपली ओळख विश्वासाचे प्रतीक, विकसित होत असलेला वारसा आणि कालातीत सौंदर्य म्हणून अधिक मजबूत करत असून, परंपरा आणि आधुनिक भारत यांच्यातील एक सशक्त नाते निर्माण करत आहे.



# आज जयभवानी महाविद्यालयात इस्राईल येथील शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.२२ जानेवारी**

पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर यांच्या प्रेरणेने विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर इन बायोटेक्नॉलॉजी फिल्ड या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेत इस्राईल येथिल शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांचे महाविद्यालयात सकाळी ठिक.१०:००वा. मार्गदर्शन लाभणार आहे.तरी पाटोदा तालुक्यातील विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा !असे संयोजन समितीच्या वत्तीने कळविण्यात आले आहे.या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर तर अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे उपस्थित राहाणार आहेत.तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा!असे संयोजन समितीच्या वत्तीने अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे व वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.बाळासाहेब जोशी यांनी कळविले आहे.

# जैविकतंत्रज्ञान क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी !-शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.२२ जानेवारी**

जागतिकीकरणात जैविकतंत्रज्ञान (बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रात भरपूर संधी निर्माण झाल्या आहेत.असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे भूमीपुत्र तथा इस्राईल येथिल आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांनी केले.ते पाटोदा येथिल जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित करिअर इन बायोटेक्लॉजी फिल्ड या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की २०व्या शतकात जैविकतंत्रज्ञानाचा उदय झाला व अतिशय वेगाने विकास झाला आज जागतिक स्तरावरील सर्वच देशात सर्व क्षेत्रात जैविकतंत्रज्ञाना वापर केला जात आहे.शेती,बी- बियाणे,मेडिकल क्षेत्रात जैविकतंत्रज्ञान ही गरज निर्माण झाली आहे.तेव्हा युवकानी करिअर साठी जैविकतंत्रज्ञान क्षेत्रात जावे भरपूर संधी आहेत.असे अहवान केले.तसेच संशोधन क्षेत्रात ही भरपुर वाव आहे हे त्यांनी पीपीटी च्या आधारे अतिशय सोप्या भाषेत माहिती सांगितली.या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक व कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांची उपस्थिती होती.पाहुण्यांचा परिचय व प्रस्ताविक वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.बाळासाहेब जोशी यांनी केले.तर प्रा.विनोद किर्दक व प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी जैविकतंत्रज्ञान ही काळाजी गरज असल्याचे सांगितले.तर प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की जैविकतंत्रज्ञान या महत्वाच्या विषयासंबधी विद्यार्थांना ज्ञान मिळावे व त्या क्षेत्रातील एक संशोधक यांच्याबरोबर विद्यार्थ्यांना चर्चा करता यावी म्हणुन या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.तसेच आपल्या जिल्ह्याचे भूमीपुत्र इस्राईल सारख्या प्रगत देशात संशोधक म्हणुन काम करतात .याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे.असे सांगुन या क्षेत्रात करिअर करावे असे विद्यार्थ्यांना अहवान केले.या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा.शिवाजी भोरे यांनी केले.तर आभार प्रा.आनंद भगत यांनी व्यक्त केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद,बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.ही एक दिवसीय कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन समिती व प्रा. डॉ.बंडू लोखंडे,प्रा.डॉ. अशोक देवगुडे,प्रा.डॉ. गोविंद बामदळे,प्रा.शेख खैसर ,प्रा.बजरंग डिसले प्रा.नारायण फुन्ने,प्रा.पापाजी चव्हाण व ग्रथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे यांनी अथक परिश्रम घेतले.या कार्यशाळेचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.

# श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय शाळेत बहरली आनंद नगरी

**हळदी कुंकू व माता पालक मेळाव्याचे ही करण्यात आले होते आयोजन**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२२ जानेवारी**

प्रत्येक विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत गुरुवारी दि.२२ रोजी आनंद नगरीसह हळदी कुंकू व माता पालक मेळावा आयोजन करण्यात आला होता. या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांनी व माता पालक यांनी मोठ्या उत्साहात सहभाग दर्शवून आनंद घेतला.

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत गुरुवारी दि.२२ रोजी आनंद नगरीसह हळदी कुंकू व माता पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप तर प्रमुख पाहुणे म्हणून पीएस आय निशिगंधा खुळे, केंद्र प्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक नामदेव शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवास देवकते आदींची प्रमुख उपस्थिती होती. या स्टॉलचे उद्घाटन पी एस आय निशिगंधा खुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना व माता पालक यांना मार्गदर्शन करताना पी एस आय निशिगंधा खुळे यांनी मुलीच्या सुरक्षे विषयी मार्गदर्शन करताना गुड टच बॅड टच या विषयी सांगितले तसेच महिला व बाल सुरक्षा यांच्या कलमा संदर्भात माहिती देऊन मुलींचे लग्न हे १८ वर्ष पूर्ण झाल्यावर करावे जो कोणी या अगोदर आपल्या मुलींचे लग्न करेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होईल असे सांगून विद्यार्थ्यांना करिअर विषयी




मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी तसेच मुलांचे मनोरंजन व्हावे तसेच त्यांना व्यवहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने सदरील आनंद नगरीचे आयोजन मोठ्या थाटामाटात करण्यात आले होते. हा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिभाऊ आघाव यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, सहशिक्षक भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर, नवनाथ घुगे, हरीभाऊ आघाव, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदींनी सहकार्य केले.